दैनिक

वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

dailyglobalbharat@gmail.com

# ग्लोबल भारत

संपादक - शरद खेमचंद अडागळे

www.globalbharatlive.com

❑ औरंगाबाद ❑ वर्ष ४ थे ❑ अंक ९८ वा ❑ मंगळवार दि.०२ जानेवारी २०२४ ❑ पाने ८ ❑ मुल्य ५ रू

# नवीन मोटार वाहन कायद्याविरोधात ट्रक चालक आक्रमक

## पोलिसांवर दगडफेक; काठ्यांनी मारहाण, ५० जणांना घेतले ताब्यात







मुंबई दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- नवीन मोटार वाहन कायद्याविरोधात नवी मुंबई ते जेएनपीटी मार्गावर कोंबडभुजे गावालगत असलेल्या रस्त्यावर ट्रक चालकांचे आंदोलन सुरु होते. सकाळी साडे अकरा बारापर्यंत सदर आंदोलन सुरळीत सुरु होते. मात्र त्यानंतर पुन्हा रस्ता अडवण्याचा प्रयत्न सुरु झाला. त्याला विरोध करणाऱ्या पोलिसांवर ट्रक चालकांनी हल्ला चढवला. आंदोलकांनी पोलिसांना मारहाण करीत मागे हटवले तसेच दगडफेक आणि काठ्यांनी मारहाण केली आहे.


दरम्यान नालासोपाऱ्यात देखील ट्रक चालकांनी रस्त्यावर टायर्स जाळून आपला निषेध व्यक्त केला. त्यांनी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करत मोटार वाहन कायद्यातील नव्या सुधारणेला विरोध केला. यावेळी त्यांची पोलिसांशी शाब्दिक चकमकही उडाली.

जेएनपीटी मार्गावर बेलापूर जवळ कोंबडभुजे गावालगत असलेल्या रस्त्यावर चक्का जाम आंदोलन सुरु केले. सकाळच्या प्रहरात आंदोलन शांततेत सुरु झाले. पोलिसांनी रस्त्यावरील ट्रक बाजूला करीत वाहतूक सुरळीत केली. मात्र दुपारी साडे बारा नंतर काही उत्साही ट्रक चालकांनी पुन्हा रस्ता अडवण्याचा प्रयत्न केला. त्याला पोलिसांनी अटकाव करत असताना, समजूत काढत असताना काही ट्रक चालकांनी सामान्य गाड्यांना लक्ष करीत काठ्यांनी हल्ला केला. यात अनेक गाड्यांच्या काचा फुटल्या. यानंतर त्यांनी पोलिसांवर दगडफेक केली गेली आणि काठ्यांनी काही पोलिसांना मारहाण केली गेली. पोलिसांनी अधिक कुमक मागवली आणि लाठीचार्ज करीत ५०पेक्षा अधिक ट्रक चालकांना ताब्यात घेतले आहे.

नव्या मोटार वाहन कायद्यात अपघात झाल्याच्या स्थितीत ट्रक चालकाला जबाबदार धरण्यात येणार आहे. या प्रकरणी त्याला १० वर्षांची शिक्षा व साडे ७ लाखांच्या आर्थिक दंडाला सामोरे जावे लागेल. या तरतुदीला देशभरातील ट्रक व टँकर चालकांनी विरोध केला आहे. हा कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी पेट्रोलियम कंपन्यांच्या टँकर चालकांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

सोमवारी या प्रकरणी देशभरात (पान ४ वर)

## जपान शक्तीशाली भूकंपाने हादरला; पश्चिम समुद्र किनाऱ्यावर त्सुनामी





टोकीयो दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- नववर्षाचे धुमधडाक्यात स्वागत सुरु असतानाच आज सोमवारी (१ जानेवारी) उत्तर मध्य जपानमध्ये७.६ रिश्टर स्केल तीव्रतेचा शक्तीशाली भूकंप झाला आहे. जपानच्या हवामान संस्थेने इशिकावा, निगाता आणि तोयामा प्रीफेक्चर्सच्या किनारपट्टीवर त्सुनामीचा इशारा दिला होता. त्यानंतर पश्चिम भागात जोरदार भूकंपाचे धक्के बसले, असा दावा अहवालात करण्यात आला आहे. होकुरिकू इलेक्ट्रिक पॉवरने सांगितले की ते त्यांच्या अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये तपासणी केली जात आहे, असे जपानी सार्वजनिक प्रसारक टीव्हीने वृत्त दिले आहे. जपान मेट्रोलॉजिकल एजन्सीने इशिकावा आणि जवळपासच्या प्रांतांमध्ये भूकंप झाल्याची माहिती दिली, त्यापैकी एकाची प्राथमिक तीव्रता ७.४ (पान ४ वर)

## इंडिया आघाडीची दारं सध्या तरी आमच्यासाठी बंद, त्यांनी ठरवावं कधी प्रवेश द्यायचा -प्रकाश आंबेडकर



मुंबई दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- इंडिया आघाडीमध्ये वंचित बहुजन आघाडी सहभागी होण्यावरून सध्या चर्चा सुरू आहे. दरम्यान यावर इंडिया आघाडीमध्ये आम्हाला कधी घ्यायचे हे आत्ता त्यांनी ठरवायचं आहे. पण आत्ता तरी आमच्यासाठी इंडिया आघाडीचे दार बंद आहे अशी प्रतिक्रिया वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांनी दिलीये. आता आम्ही एकत्र येणारच आहोत, शरद पवारांच्या भेटीवर प्रकाश आंबेडकरांनी प्रतिक्रिया दिली आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, आता आम्ही एकत्र येणारच आहोत त्यामुळे भेटी होणार आहेत. एखाद्या भेटीविषयी स्पेक्युलेशन करायला नको. आम्ही एकत्र येणार आहोत. त्यामध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आहे, त्यामुळे शरद पवार यांचीही भेट होत राहणार आहे. इंडिया आघाडीमध्ये आमचा समावेश कधी होणार आहे हे त्यांनीच ठरवायचे आहे तेच ठरवणार आहे.

दरम्यान प्रकाश आंबेडकर हे महाराष्ट्राच्या राजकारणातलं समाजकारणातलं मोठं नाव आहे. आम्हाला विश्वास आहे की प्रकाश आंबेडकर इंडिया आघाडीत (पान ४ वर)

## छगन भुजबळांना वेड लागलंय; मनोज जरांगेंची खोचक टीका

बीड दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- छगन भुजबळ यांच्या बीडमध्ये होणाऱ्या सभेवर मनोज जरांगे पाटलांची पहिली प्रतिक्रिया आली आहे. छगन भुजबळ यांना वेड लागलं, मात्र लोकशाहीमध्ये सभा घेण्याचा त्यांना अधिकार असल्याचे मनोज जरांगे म्हणाले आहेत. १३ जानेवारी रोजी छगन भुजबळ यांची बीडमध्ये महासभा होणार असून, याच सभेपूर्वी मनोज दरांगे पाटील यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

मराठा समाजाला सरसकट ओबीसमधून आरक्षण देण्यात येऊ नयेत या मागणीसाठी मागील काही दिवसांपासून राज्यभरात ओबीसी मेळावे आयोजित केले जात आहे. दरम्यान, १३ जानेवारी रोजी बीडमध्ये या ओबीसी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, छगन भुजबळ देखील यावेळी उपस्थित असणार आहे. यावर बोलतांना मनोज जरांगे म्हणाले की, ‘‘छगन भुजबळ यांना (पान ४ वर)

## देवेंद्र फडणवीस गृहमंत्री झाल्यापासून महाराष्ट्रात गुन्हेगारी वाढली; सुप्रिया सुळेंचा हल्लाबोल



पुणे दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- ‘‘उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गृहमंत्रीपदाची जबाबदारी संभाळण्यास पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. ते गृहमंत्री झाले तेव्हापासून महाराष्ट्रात गुन्हेगारी वाढली आहे‘‘,अशी टीका बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. महाराष्ट्र पोलिसांच्या सातत्याने बदल्या करण्यात येत आहेत. त्यांना पारदर्शकपणे काम करु दिले जात नाही. गेल्या १५ दिवसांपूर्वी केंद्र सरकारने गुन्हेविषयक नवं विधेयक मांडलय.ज्यामध्ये फोन टॅपिंग अधिकृत करण्यात आलीये. गृहमंत्रालय पूर्णपणे अपयशी ठरलंय, असा दावाही सुळे यांनी केला. त्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या.

सुप्रिया सुळे म्हणाल्या,गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र आणि देशाच्या समाजकारणात आंबेडकर कुटुंबीयांनी मोठं योगदान दिलंय. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनीही चांगल्या पद्धतीने काम केलंय. संविधान आणि देश वाचवण्यासाठी प्रकाश आंबेडकरांची गरज आहे. नव्या पिढीला त्यांनी मार्गदर्शन करावे. इंडिया आघाडीतही त्यांचा मोठा रोल असणार आहे, असा मला विश्वास आहे. संविधानासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी आम्ही सर्वांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतलाय, असे (पान ४ वर)

## सुप्रिया ताई १५ वर्ष दादांमुळे निवडून आल्या-रुपाली चाकणकर

पुणे दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार अमोल कोल्हे यांच्यातील वाद आता टोकाला जातांना पाहायला मिळत आहे. एका खासदाराला निवडून आणण्यासाठी मी आणि वळसे पाटलांनी प्रयत्न केला, नाव न घेता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खासदार अमोल कोल्हे यांच्यावर टीका केली. दरम्यान आज अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे अजितदादांमुळेच खासदार झाल्याचे वक्तव्य केले आहे.

रुपाली चाकणकर म्हणाल्या, दादांवर बोलणारे दोन्ही खासदार दादांमुळे निवडून आले आहेत. सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे अजितदादांमुळेच खासदार झाले आहेत. दादा सोबत नाही म्हणून तळ ठोकावा लागत आहे. सुप्रीया सुळे गेली १५ वर्ष अजितदादांमुळे निवडून आल्या आहेत. बारामती लोकसभा (पान ४ वर)

## महायुतीत अद्याप जागावाटपाची चर्चा नाही; अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा दावा

मुंबई दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सत्ताधारी महायुतीमध्ये अद्याप जागा वाटपाची चर्चा सुरू झाला नसल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केला आहे. भाजपने महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४८ पैकी ४५ जागा जिंकण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. त्यासाठी हा भगवा पक्ष अंग झटकून कामालाही लागला आहे. पण तटकरे यांच्या दाव्यामुळे महायुतीत जागावाटपाच्या मुद्यावरून मोठा वाद असल्याचे स्पष्ट झाले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे विरोधकांच्या महाविकास आघाडीने सोमवारीच आपले जागावाटप जवळपास निश्चित झाल्याचे स्पष्ट केले आहे.

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जागावाटपाचा तेढ सध्या निर्माण झालाय. तसेच जागावाटपावरुन बराच संभ्रम देखील असल्याचे पाहायला मिळत आहे. पण महायुतीमध्ये अद्यापही जागावाटपावरुन कोणतीही प्राथमिक चर्चा सुरु झाली नसल्याचा दावा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे यांनी केला आहे.

दरम्यान सुनील तटकरे पुढे बोलताना म्हणाले की, १४ जानेवारी रोजी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये महायुतीच्या प्रमुख कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. महायुतीमधील तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते या बैठकांना उपस्थित राहणार असल्याचे देखील सुनील तटकरे यांनी यावेळी म्हटले आहे. अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष (पान ४ वर)

## राज्य सरकार ग्रामीण भागात १०० कौशल्य विकास केंद्र स्थापन करणार

मुंबई दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- महायुती सरकारने नवीन वर्षात १५ ते ४५ वयोगटातील व्यक्तींना नव्या वर्षाची भेट म्हणून नवे १०० कौशल्य विकास केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा हे कौशल्य विकास सोसायटीमार्फत प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत १०० महाविद्यालयांमध्ये संबंधित नवी कौशल्य विकास केंद्र सुरु करणार आहेत.

तरुणांना रोजगारक्षम बनवण्यासाठी नुकतीच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते राज्यात ५११ कौशल्य विकास केंद्र सुरु करण्याचा विक्रम लोढा यांनी केला होता. त्यानंतर पुन्हा कौशल्य विकास हा ग्रामीण भागात केंद्रीत असावा, या उद्देशाने हे कॅबिनेट मंत्री लोढा यांनी हा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे रोजगारासाठी गावातून शहराकडे होणारे स्थलांतर कमी होईल, अशी शासनाची धारणा आहे.

युवकांसाठी प्रशिक्षण आणि संधीच्या दृष्टीने ही संकल्पना सुरु करण्यात आली आहे. या प्रशिक्षणामुळे युवकांच्या जीवनात नवी पहाट येणार आहे. जगभरात भारतातील प्रशिक्षित तरुणांना मागणी आहे. अन्य देशांमध्ये अनुभवी लोकांची संख्या वाढत आहे. हा कार्यक्रम राज्यस्तरावर होणार असल्याने त्यात उद्योग, महसूल, ग्रामविकास आणि महिला व बालविकास विभागाचाही सहभाग आहे. ग्रामपंचायत, पंचायत, जिल्हा परिषद सदस्य, आमदार, खासदार यांच्यासह आशा व अंगणवाडी सेविका आदींचा सहभाग कौशल्य विकास केंद्राच्या उद्घाटनात आहे. विश्वकर्मा योजनेतील लाभार्थी यांना कार्यक्रमात सहभागी करून घेण्याचे प्रशासनाचे प्रयत्न आहेत, असे लोढा यांनी सांगितले. राज्यातील ग्रामीण भागातील तरुणांना आणि उद्योजकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामाध्यमातून पारंपारिक आणि व्यावसायिक कौशल्य क्षेत्रातील प्रशिक्षण देण्यात येईल. पंतप्रधान विश्वकर्मा योजनेसाठी ही विकास केंद्रे उपयुक्त ठरणार असल्याचं सांगण्यात येत आहे. या केंद्रामध्ये एकावेळेस जास्तीत जास्त २ जॉब-रोल्सचे प्रशिक्षण प्रदान करण्यात येईल. साधारण तीन महिन्यांमध्ये किमान २०० ते ६०० तास प्रशिक्षण देण्यात येईल. अभ्यासक्रमाची निवड जिल्हा, कौशल्य, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्यामार्फत करण्यात येईल. तसेच वर्षभराच्य कालावधीमध्ये १०० उमेदवारांच्या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येईल.

# चला नव्या वर्षात सकारात्मक जगू या!

नवीन दिवस, नवे वर्ष, नवीन आव्हाने, नवभविष्य आपल्या सर्वांचेच वाट पाहत उभे असेल. आजचा २०२३चा शेवटचा दिवस. या शेवटच्या दिवशी जेव्हा आपण उभे आहोत तेव्हा आपसूकच आपले संपूर्ण लक्ष १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या संपूर्ण कालखंडावर जाते. काय गमाविले, काय मिळविले याबाबतीत प्रत्येकाचे अनुभव, प्रत्येकाच्या आठवणी नक्कीच वेगवेगळ्या असतील. कुणासाठी हे वर्ष खूप आनंदाचे, उत्साहाच गेले असेल. कुणासाठी खूप काही चांगल्या गोष्टी घडल्या असतील. कुणाच्या आयुष्यात दुःख आले असेल, दुरावा आला असेल, एकांत आला असेल, कुणीतरी गोंधळलेले असेल, कुणाच तरी नियोजन फिस्कटल असेल, तर कोणाला तरी नवा उत्साह मिळाला असेल. अशा प्रकारे प्रत्येकासाठी प्रत्येक क्षण वेगळा गेला असेल, पण या सगळ्या गोष्टींमध्ये सगळ्यांना एक अनुभव नक्की आला असेल तो म्हणजे हे वर्ष २०२२ पेक्षा जरा जास्तच वेगाने धावत गेलं आणि या वर्षात त्या वर्षाबरोबर धावताना आपलीही दमछाक झाली. आयुष्यात सतत घडणाऱ्या चांगल्या, वाईट घटनांचा सामना करताना, त्यांचा सामना करताना आपलीही नक्कीच दमछाक झाली. जग यावर्षी जरा जास्त वेगाने धावत धावू लागलायं असे नक्कीच वाटते. या सरणाऱ्या वर्षाने चांगल्या वाईट घटना पाहिल्या; आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय, जिल्हास्तरीयने अगदी आपल्या स्थानिक पातळीवर पण अनेक चांगल्या वाईट घटना घडल्या. हे सगळं घडत असताना आयुष्याचे हे सगळे अनुभव आपण घेत असताना आपलं मन, आपला मेंदू आणि नकळत आपले शरीर थकून गेलंय याची जाणीव अशा वेळी होते. खूप धावलो, खूप मेहनत केली, खूप कष्ट केले, खूप काम केले की शरीर हे दमणारच. पण कष्ट करणे हे प्रत्येक माणसासाठी उद्याची नवी ऊर्जा असते आणि त्या ऊर्जेतूनच त्याचं भविष्य घडत असते, त्यामुळे कामासाठी कष्ट करणे हे नेहमी चांगले असते; परंतु आज-काल अनेक चांगल्या वाईट घटना आजूबाजूला घडत असतात, समाजमाध्यम अधिक बळकट झालेली असल्यामुळे या घटना आपल्या समोर काही क्षणात येतात, या घटनांचे चांगले वाईट परिणाम आपल्यावर होत असतात. त्यातही नकारात्मक, वाईट घटना, वाईट गोष्टी प्रकर्षाने समोर येतात किंवा आपले मन सगळ्यांमध्ये अशा गोष्टी अलगद टिपत असते आणि याच प्रमाण वाढले की आपले मन थकत जाते. असाच काहीसा थकवा आपल्याला आला आहे असे वाटत असेल तर यावर नक्कीच विचार करण्याची गरज आहे. उद्या नवीन वर्ष आहे. नव्या उत्साहाने त्याला सामोरे जायचे आहे. अशा वेळी आपल्या तब्येतीची, आपली, घरातली, आर्थिक, व्यावसायिक, सामाजिक जुळणी करायची असेल तर यासाठी आपले मन अधिक सशक्त असणे आवश्यक आहे. २०२०, २०२१ आणि २०२२ ही वर्ष कोरोनाची वर्ष म्हणून पाहिली गेली. खूप काळाकुट्ट ढगांनंतर २०२३ मध्ये काही आशेची किरणं आजूबाजूला डोकावू लागली होती. २०२४ मध्ये हे चित्र अधिक आशादायी होण्याची गरज आहे. अर्थात २०२४ या वर्षाची सुरुवात करताना आपणही बदललं पाहिजे, आपले विचारही बदलले पाहिजेत. मनावरची नकारात्मकतेची काळीकुट्ट जळमट दूर केली पाहिजेत. त्यातून सकारात्मकतेची सूर्यकिरण डोकावली पाहिजेत. तरच येणाऱ्या प्रत्येक आव्हानांना आपण सहज सामोरे जाऊ शकतो. कुठलाही दिवस, कुठलाही काळ आणि वेळ सारखी नसते, प्रत्येक दिवशी ते बदलत असते. सुखाचे काही क्षण असतात, पण सुखामागोमाग दुःख हे येतच असते. जशी भरती पाठोपाठ ओहोटी असते तसेच आपल्या या सुखदुःखांच्या जाणिवांचे असते. अशा वेळेला नव्या वर्षात परिपक्वतेकडे एक पाऊल टाकत असताना या सगळ्या गोष्टींची गोळाबेरीज आपल्या मनात असणे आवश्यक आहे. खरंतर भौतिक सुखाच्या मागे धावण्याऐवजी आत्मिक सुख कसे मिळेल, समाधान कसे मिळेल, आयुष्यात शांतता कशी मिळेल, एकमेकांशी असलेल्या ऋणानुबंध अधिक घट्ट कधी होतील. समाज माध्यमांमधील काल्पनिक विश्वापेक्षा प्रत्यक्ष एकमेकांना आपण कसे भेटू, एकमेकांच्या दुःखात कसे सहभागी होऊ याची जाणीव जेव्हा प्रत्येकाला होईल त्यावेळेला आपण आणि आपला समाज अधिक समृद्ध होईल. याची सुरुवात १ जानेवारी २०२४ पासून प्रत्येकाने केली पाहिजे. प्रत्येकाच्या मनात एक रोज नवा सकारात्मक विचार आला पाहिजे. एखादी वाईट घटना घडली तरीही त्यातून त्यात कुढत बसण्यापेक्षा त्यातून नवे पाऊल कसे टाकता येईल, त्यातून पुढे कसे जाता येईल ही जाणीव करण्यासाठी हा विचार मनात येण्यासाठी मन सशक्त करायला पाहिजे. यासाठीच यावर्षी आपण आपल्या मनाची मशागत करूया. त्याच्या माध्यमातून चांगल्या सकारात्मक मार्गाकडे आपण वळू या आणि येणाऱ्या आपल्या आयुष्यातील प्रत्येक दिवस, प्रत्येक क्षण, प्रत्येक वेळ हा चांगला आनंदी आणि समाधानाचा करूया, असा संकल्प करीत आपण नवीन वर्षात पाऊल ठेवूया आणि अन्य संकल्पनांपेक्षा हा संकल्प कायम जपूया.

# ओबीसीच्या भावी पिढीचे नुकसान टाळण्यासाठी!

ओबीसीच्या भावी पिढीचे नुकसान टाळण्यासाठी आज संपुर्ण ओबीसी सुतार समाजाने संघटीत होणे गरजेचे आहे. विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची लोकसंख्या राज्यभरात ५० लाखाच्या जवळपास असल्याचे सोशल मीडियावर वाचण्यात आले आहे.राज्यातील ३६ जिल्ह्यातील जवळजवळ ३५० तालुक्यात विश्वकर्मीय सुतार समाज विस्तारित आहे आणि राज्यभरात विविध राज्यस्तरीय सामाजिक संघटना कार्यरत आहेत याच संघटनेच्या माध्यमातून समाजात विविध विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केले जातात यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक संघटनेचे जबाबदार अध्यक्ष आणि विविध पातळीवर पदाधिकारी वर्गाची निवड करण्यात येते या मधूनच समाजात समाज नेतृत्व म्हणुन उदयास येत असते.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजातील स्वतःला समाज नेतृत्व म्हणवुन घेणाऱ्या समाज नेत्यांनी तसेच पत्रकार,साहित्यिक,विचारवंतानी ओबीसी आरक्षण,ओबीसी जनगणना,सत्तेतील राजकीय हिस्सेदारीसाठी समाजात जाऊन प्रबोधन करणे गरजेचे आहे. ओबीसी कडे संपत्ती असेल आणि ज्ञान नसेल तर संपती काय कामाची असं म्हटलं तर वावगे ठरणार नाही.भारतीय संविधान पाहिले नसेल तर वाचणार कधी म्हणूनच ओबीसी समाजात संविधान विषयी आवर्जुन राज्यभरात जनजागृती करणे अतिशय गरजेचे आणि आवश्यकता आहे.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज हा संवैधानिक दृष्टीने ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक असतांना सुतार समाजात ओबीसी बद्दल समाज जागृती होतांना दिसत नाही.आज समाजात ज्या गोष्टींची गरज आहे त्याकडे दुर्लक्ष केले जाते आणि वधू वर सूचक मेळाव्यावर जास्त भर दिला जातो.सामाजिक ,शैक्षणिक,सांस्कृतिक,कला,क्रिड ा कार्यक्रमाचे आयोजन केल्यास ओबीसी समाजातील तरुणांच्या कलाकौशल गुणवंता बाहेर काढण्यास संधी मिळेल. त्यामुळेच ओळख नसलेला ओबीसी तरुण समाजात ओळख निर्माण करेल.त्यातून वधू वर संशोधनाची मोठी समस्या सुटू शकते.ओबीसी समाजात इतर छोटेमोठे कार्यक्रम राज्यभरात समाजात आयोजित केले जातात. त्यांचा राजकीय पक्षांना फायदा होतो.त्यातून कार्यकर्ता कार्यकर्ताच राहतो.तो ओबीसी समाजाचा नेता होऊ शकत आणि पक्षाचा पण नेता होऊ दिला जात नाही.प्रत्येक पक्षातील ओबीसी नेत्यांची यादी काढा त्यांच्या जातीत त्यांना किती मानले जाते ते तपासून पहा.ज्याला स्वतःच्या जातीत किंमत नाही त्याला ओबीसी नेता म्हणून मोठे केले जाते.म्हणूनच ओबीसी समाजाने हे समजून घेऊन बदलणे गरजेचे आहे.आता आज ओबीसीच्या क ार्यकर्ता,नेता,पत्रकार,साहित्यिक, विचारवंतानी स्वतःला बदलून घेतले नाही तर ओबीसीच्या भावी पिढीचे मोठे नुकसान झाल्या शिवाय राहणार नाही.

राज्यात आणि देशात ओबीसी समाजातील विविध ओबीसी संघटना ओबीसी नेते, ओबीसी बहुजन समाजात जनजागृती अभियान राबवित आहेत.असे असताना ही विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाच्या संघटना,संस्था आणि जबाबदार पदाधिकारी, नेतेमंडळी वैचारिक दुष्ट्या दिशाहीन अवस्थेत वावरत आहेत. त्यांच्यामुळे ओबीसी समाजाच्या विविध पातळीवर कार्यरत पदाधिकारी मात्र ओबीसी बद्दल कोणताही ठोस कृती कार्यक्रम नसल्यामुळे गप्प बसून आहेत. त्यांच्या या वागण्यामुळे ओबीसीच्या येणाऱ्या भावी तरुण पिढीचे नुकसान होईल याचा विचार करण्याची जबाबदारी समाजातील नेत्यांची आहे.

ओबीसी समाजाची ५२ टक्के संख्या असतांना त्यांना कोणत्याही पक्षात मान्यताप्राप्त पद व निर्णय प्रक्रियेत स्थान नाही.आज नाही तर भविष्यात काय स्थान असेल याचा विचार करण्याची गरज आहे.ओबीसी समाजातील आजच्या पिढीला संविधान माहिती नसेल तर भावी पिढीला ते कोण सांगणार आहे. ओबीसी आरक्षण,जनगणना,राजकीय आरक्षण याबाबत कोणाचीच ठोस भूमिका नाही.सत्तेत सहभाग नाही,त्याबाबतचे ज्ञान नाही. त्यासाठी समाजात संघटना,संस्था पाहिजेत.संबंधित असलेले सर्वंच पदाधिकारी आणि स्वतःला समाज नेते म्हनवुन घेणाऱ्या अशा सर्वच समाज मान्यवरांनी समाजात ओबीसी बद्दल आणि इतर विषयावर प्रबोधन,जनजागृती कार्यक्रम राबविणे गरजेचा आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

सुतार समाज हा स्वतःला सुशिक्षित उच्चवर्णीय समजतो. इथंच समाजात जागृतीचा मोठा अभाव जाणवतो,वास्तविक विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी समाज आहे. याचे भान सुद्धा नसावे याचे वाईट वाटते,सुतार समाजात आजही विश्वब्राह्मण म्हणजे उच्चवर्णीय समजतात आपण ओबीसी आहोत आणि ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक आहोत या बद्दल समाजात जबाबदारीने सांगण्यास कोणीही पुढाकार घेतांना दिसतं नाही त्यामुळे समाजात चुकीची माहिती पसरवली जाते आणि विश्वकर्मीय सुतार समाज ओबीसी समाजाचा एक मोठा ओबीसी घटक आहे.हे आजच्या तरुण पिढी पासून लपविले तर भविष्यात येणारी तरुण पिढी स्वतःला काय म्हणून घेणार याचा गांभीर्याने जबाबदारीने विचार कोणी करतांना दिसत नाही.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय सुतार समाजातील पत्रकार,साहित्यिक,विचारवंतानी हे अज्ञान दूर केले पाहिजे.अन्यथा काळ त्यांना कधीच माफ करणार नाही.वास्तविक पाहता समाजात अनेक जबाबदार मान्यताप्राप्त व्यक्ती आहेत त्यांची जबाबदारी आहे ती त्यांनी समाज जनजागृती वैचारिक प्रबोधन करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.परंतु,असे होतांना दिसत नाही याला समाजाचे भाग्य म्हणावे कि,दुर्भाग्य म्हणावे असा प्रश्न आजच्या तरुण पिढीला पडला पाहिजे.पण जिथे बापच जाग्यावर नाही तर पोर काय करतील. विश्वकर्मीय सुतार सामाजिक क्षेत्रात अनेक संघटना आहेत अनेक सामाजिक संस्था अस्तित्वात आहेत आणि त्या त्या सामाजिक संघटना संस्थेच्या कार्यकारिणी मध्ये सुशिक्षित उच्चशिक्षित,प्रतिष्ठित पदाधिकारी विराजमान आहेत.पण त्यांना स्वतःची कोणतीही विचारधारा नसेल तर ते वर्ण व्यवस्थे नुसार श्रद्धा,सबुरीने गुलामगिरीचं स्वीकारतील.पूर्व जन्माचे पाप आहे हे कुणालाच चुकले नाही हे त्यांच्या मेंदूत कायम बसले राहणार.विश्वकर्मीय समाज आजही कर्मकांड,धार्मिकता,काल्पनिक गोष्टींचा प्रचार व प्रसार करतांना दिसतो.

समाजात वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकार केल्या शिवाय समाजात प्रगती होणार नाही याकडे समाजातील जबाबदार असणारे पदाधिकारी परखडपणे भाष्य करीत नाहीत.समाजात परखडपणे जनजागृती प्रबोधन करण्यास धजावत नसतील तर त्यांना विश्वकर्मीय सुतार समाजातील पत्रकार,साहित्यिक,विचारवंत म्हणताच येणार नाही.त्याचे मुख्य कारण म्हणजे सामाजिक संघटना,संस्थेच्या कार्यकारिणीने समाजाला सत्य सांगितले तर समाज आपल्या पासुन दुर जाण्याची भिती सतावत असेल म्हणुन समाजात या बाबतीत जनजागृती प्रबोधन होत नाही. पर्यायाने समाजात अंधश्रद्धा आणि धार्मिकता बळावत जात आहे.आणि वैज्ञानिक दृष्टीकोन मागे पडत आहे हे कोणाच्याही लक्षात कसे येत नाही.हाच मोठा प्रश्न मला पडतो.विश्वकर्मीय सुतार समाजातील पत्रकार,साहित्यिक,विचारवंतांना का पडत नाही.?

समाजात सुशिक्षित वर्गाचे प्रमाण जास्त आहे तरी सुद्धा समाजात अंधश्रद्धा आणि धार्मिकता दुर करण्यास अपयश का येते हा चिंतनाचा विषय आहे.असे मला वाटते विश्वकर्मीय सुतार समाजातील पत्रकार,साहित्यिक, विचारवंतांना काय वाटते माहिती नाही.मी वाचायला,बोलायला व लिहायला लागलो म्हणूनच समजायला लागलो.एकीकडे ओबीसी म्हणुन संवैधानिक दृष्टीने सर्वंच हक्क अधिकार मिळवायचे आणि दुसरीकडे ओबीसी बद्दल समाज प्रबोधनात्मक दृष्टीने मागे राहायचे असे दुटप्पी धोरणाचा अवलंब करायचा यामुळे समाजात वैचारिक आणि सामाजिक परिवर्तन होणार नाही. हे मला कळायला लागले.

ओबीसी बहुजन समाजासाठी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संवैधानिक दृष्टीने जनतेला अधिकार हक्काची जाणिव करून दिलेली असतांना त्याचा उपयोग समाजाला झाला पाहिजे यासाठी लढा उभारला पाहिजे विश्वकर्मीय सुतार समाजातील पत्रकार,साहित्यिक,विचारवंतां स्वतःला समाज नेतृत्व समजणाऱ्या नेत्यांना का वाटत नाही.आजची तरूण पिढी उद्याचे भविष्य आहे.असे केवळ बोलून चालणार नाही.तरूण पिढीला योग्य मार्गदर्शन आणि पर्याय दिला पाहिजे.तो मिळाला नाही तर मात्र तरूण पिढीचे भविष्यात वैचारिक नुकसान होईल याचा विचार करणे गरजेचे आहे. विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक आहे समाजातील स्वतःला समाज नेतृत्व आणि जबाबदार व्यक्तिमत्त्व समजणाऱ्या प्रत्येक घटकांना याचा विसर पडु नये हि नैतिक जबाबदारी प्रत्येकांची आहे.म्हणूनच भावी पिढीचे नुकसान टाळण्यासाठी गरजेचे आहे.

जय संत भोजलिंग.जय ओबीसी,जय संविधान,

**– प्रमोद सुर्यवंशी,**
चिखली मातृतीर्थ बुलडाणा.

***




## “माझा स्त्री अवतार घेणे हा नेहमीच विनोदी प्रकार नसून त्यामुळे नाट्य अधिक रंगतदार होईल.”असे शब्बीर आहलुवालिया म्हणाला

झी टीव्हीवरील ‘प्यार का पहला नाम राधा मोहन’ ही आधुनिक काळातील वृंदावनमध्ये घडणारी एक परिपक्व प्रणयी नाट्य असून सुरूवातीपासूनच ही मालिका प्रेक्षकांची आवडती बनलेली आहे. मनमोहक कथानक आणि ह्या मालिकेतील मोहन (शब्बीर आहलुवालिया), राधा (नीहारिका रॉय) आणि दामिनी (संभाबना मोहन्ती) अशा बळकट व्यक्तिरेखांनी गेले दीड वर्ष प्रेक्षकांना आपल्या खुर्चीला खिळवून ठेवले आहे. अलिकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की मोहनचा आवाज हळूहळू बदलत जातो, त्याचे डोळे लाल होतात आणि नखे रंगीत होतात. हे सगळे पाहून राधा आणि त्याच्या कुटुंबियांना धक्काच बसतो. आगामी भागांमध्ये काय होते ते पाहून प्रेक्षकांच्या अंगावर काटाच येईल. शब्बीर आहलुवालियाचे चाहते त्याला शारीरिकदृष्ट्या स्त्री अवतारात बदलल्याचे पाहतील.आपले हे रूप अगदी खरे वाटावे म्हणून टीव्हीवरील ह्या सुपरस्टारने त्याचा हा नवीन अवतार प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. मोहनच्या व्यक्तिमत्त्वामध्ये येणारे हे बोल्ड ट्रांसफॉर्मेशन ह्या मालिकेच्या कथेमध्ये नक्कीच क्रांतिकारी बदल घडवेल, एक मोठे सत्य प्रभावीपणे उघड करेल आणि सगळी कायाच पालटवून टाकेल.

शब्बीर म्हणाला, “अनेक कलाकारांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये कुठल्या ना कुठल्या वेळी क्रॉस-ड्रेसिंग केले आहे, पण ते बहुधा विनोद निर्मितीसाठी करण्यात आले आहे. मात्र, माझ्या व्यक्तिरेखेचे स्त्री अवतारात रूपांतर झाल्यामुळे कथानकातील नाट्यात आणि प्लॉटमधील बहुप्रतीक्षेतील हायपॉईटच्या गांभीर्यात भर पडेल. मी ह्या गोष्टीला एका आव्हानाच्या स्वरूपात स्वीकारले असून माझे सर्वस्व मी ह्या भूमिकेला देत आहे. मी अगदी टिपीकलपणा न आणता सहजपणे पण मर्यादा राखून ही भूमिका साकारत आहे. मी आशा करतो की मी ह्या पटकथेला न्याय दिला असून मनाची पकड घेणाऱ्या ह्या दृश्याचा प्रभाव प्रेक्षकांना नक्कीच जाणवेल.”शब्बीर ह्या नवीन अवताराला एक आव्हान समजून त्याला सामोरे जात असताना प्रेक्षकांसाठी हे पाहणे रोचक ठरेल की काय दामिनी तिचा अपराध कबूल करते की नाही?

पुढे काय होते ते जाणून घेण्यासाठी पहा ‘प्यार का पहला नाम राधा मोहन’ दररोज रात्री ८ वाजता फक्त झी टीव्हीवर

## मानसी जोशी रॉय आणि नाविका कोटिया अभिनित ‘क्यूंकि सास माँ, बहू बेटी होती है’ चे १०० भाग पूर्ण



ही वेळ आहे सेलिब्रेशन्सची कारण झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका ‘क्यूंकि सास माँ, बहू बेटी होती है’ ने हल्लीच एक मैलाचा दगड पार केला असून ह्या मालिकेचे १०० यशस्वी भाग पूर्ण झाले आहेत. ही मालिका सप्टेंबरमध्ये प्रसारित व्हायला सुरू झाली आणि तेव्हापासूनच प्रेक्षकांचे खूप प्रेम आणि प्रशंसा ह्या मालिकेला मिळत आहे. ही कथा आहे नायिका अंबिका (मानसी जोशी रॉय) ची, जी ‘सास कभी माँ, और बहू कभी बेटी नहीं बन सकती’ ह्या प्रचलित समजाच्या विरोधात जाऊन केसर (नाविका कोटिया) ह्या मुलीला दत्तक घेऊन तिला एका मुलीप्रमाणे नाही तर सुनेच्या रूपात लहानाचे मोठे करण्याचा मोठा महत्त्वपूर्ण निर्णय घेते. मोठी झाल्यानंतर ती ह्या परिवाराला एकत्र ठेवेल असा तिचा विश्वास असतो. ह्या मालिकेच्या कथानकाने प्रेक्षकांना अक्षरशः त्यांच्या खुर्चीला खिळवून ठेवले आहे.

अलिकडच्या एपिसोड्समध्ये प्रेक्षकांनी पाहिले की कसे सूरज (लक्षय खुराणा) अखेर अंबिकाला अखेर त्याच्या मनात असलेल्या अढींबद्दल जाब विचारतो आणि त्या दोघांमधील समस्या सोडवतो. ह्या गोष्टीमुळे आनंदलेले सर्वचजण सूरज आणि केसरच्या लग्नाची तयारी करत आहेत. आपल्या चाहत्यांचे मनोरंजन करण्यासाठी ह्या मालिकेचे कलाकार आणि तंत्रज्ञ अविरतपणे मेहनत घेत असून ह्या मालिकेच्या टीमने सेटवर थोडा ब्रेक घेतला आणि १०० वा एपिसोड साजरा करण्यासाठी छोटासा केक कटिंग सोहळा आयोजित केला. प्रमुख कलाकार मानसी आणि नाविका हे १०० एपिसोड्स पूर्ण करण्याबद्दल अतिशय उत्साहात होत्या आणि असे अनेक मैलाचे दगड पार करण्यासाठी उत्सुक आहेत.

मानसी जोशी रॉय म्हणाल्या, “मला तर विश्वासच बसत नाहीये की १०० एपिसोड्स पूर्णसुद्धा झाले आहेत. असं वाटतंय की कालची तर गोष्ट आहे आणि आता आम्ही आमच्या १०० व्या एपिसोडचे सेलिब्रेशन करत आहोत. मालिकेच्या प्रेक्षकांचे मी त्यांनी आम्हांला दिलेल्या प्रेम आणि समर्थनासाठी आभार मानते. हा प्रवास खूपच छान झाला असून दररोज कठोर परिश्रम घेणाऱ्या आमच्या टीमला मनापासून शुभेच्छा.”

नाविका कोटिया म्हणाली, “आम्ही आमच्या मालिकेचे १०० एपिसोड पूर्ण केल्याबद्दल अतिशय आनंदात आहे. आमच्यासाठी ही तर फक्त सुरूवात आहे आणि पुढच्या मार्गक्रमणेसाठी आम्ही उत्सुक आहोत. आमच्या चाहत्यांचे प्रेम आणि समर्थन आम्हांला असेच मिळत राहो. ह्या मालिकेला माझ्या मनात खास स्थान असून आम्हांला मिळालेल्या प्रतिसादाने मी थक्क झाले आहे. प्रत्येक एपिसोडसह आमच्या प्रेक्षकांसोबत आमचे नाते अधिकाधिक दृढ करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.” ‘क्यूंकि सास माँ बहू बेटी होती है’ च्या कलाकार आणि तंत्रज्ञांना शुभेच्छा, असेच आणखी अनेक यशस्वी एपिसोड्स व्हावेत. पुढे काय होते ते जाणून घेण्यासाठी पहा ‘क्यूंकि सास माँ बहू बेटी होती है’ दररोज संध्याकाळी ६.३० वाजता फक्त झी टीव्हीवर

**ग्लोबल भारत** हे पत्र मालक मुद्रक प्रकाशक संपादक **शरद खेमचंद अडागळे** यांनी विश्व प्रकाशन प्रिंटर्स औरंगाबाद जालना हायवे रोड बदनापुर जिल्हा जालना(महाराष्ट्र) पिन ४३१२०२ येथे छापुन दैनिक ग्लोबल भारत कार्यालय हाऊस नं १/११/ ११७ शांतीपुरा नंदनंवन कॉलनी रोड छावणी औरंगाबाद (महाराष्ट्र) पिन ४३१००१ येथे प्रकाशित केला मो ९४०३५०२५५५ / हॉटसअप ९९२११७३९५३, ईमेल dailyglobalbharat@gmail.com
(या अंकात व्यक्त केलेल्या मजकुराशी संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक सहमत नाहीत.,औरंगाबाद न्यायालया अंतर्गत)

# स्वच्छ माझा महाराष्ट्र अभियान राज्यभर राबवणार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

मुंबई दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- प्रदूषण कमी करण्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासाबरोबरच पर्यावरण संवर्धनाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी झाडे लावण्याबरोबरच स्वच्छता अभियान प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरात राबवले जाणारे स्वच्छता अभियान आता राज्यात सर्वत्र राबविण्यात येईल, असे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज स्वच्छ माझा महाराष्ट्र या महास्वच्छता अभियानास प्रारंभ केला. त्यावेळी ते बोलत होते. गेटवे ऑफ इंडिया येथे झालेल्या या कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार सदा सरवणकर, माजी आमदार राज पुरोहित, उद्योगपती नादीर गोदरेज, मुंबई महापालिका आयुक्त आय. एस. चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, डॉ. सुधाकर शिंदे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ठाणे महापालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वच्छता अभियानास प्रारंभ केला. त्यानंतर हे अभियान मुंबई शहरात राबवले. या अभियानाचा परिणाम खूप चांगला आहे. त्यामुळे हे अभियान आता राज्यात सर्वत्र राबविण्यात येणार आहे. स्वच्छ माझा महाराष्ट्र अभियानासाठी एक कार्य प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्यानुसार आपल्या कार्यक्षेत्रात स्वच्छता अभियान राबविण्यात यावे. या अभियानात लोकांना सहभागी करून घेण्यात यावे.

मुंबई शहरात सुरू केलेल्या या अभियानात शाळा, महाविद्यालय विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, ज्येष्ठ नागरिक संघ, विविध प्रतिष्ठान सहभागी होत आहेत. यामुळे या अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप येत आहे. मुंबई डीप क्लीन ड्राईव्हचे एक मॉडेल तयार झाले आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.

विकास प्रकल्पामुळे तोडाव्या लागलेल्या झाडांचे पुनर्रोपण करणार आहे. मुंबईत रिकाम्या जागेवर झाडे लावली जाणार आहेत. मुंबई शहरात अर्बन फॉरेस्ट संकल्पना राबविण्यासाठी विचार सुरू आहे. ठाणे शहरातील कोपरी परिसरापासून गायमुख पर्यंत ग्रीन पॅच तयार केला जात आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितले.

मुंबई शहरातील स्वच्छता कर्मचारी खरा हिरो आहे. कारण ते सकाळी लवकर उठून कामाला सुरुवात करतात. मुंबई स्वच्छ ठेवतात. या कर्मचाऱ्यांच्या वसाहती स्वच्छ ठेवण्यासाठी आमचा प्रयत्न आहे. सफाई कर्मचारी यांना विमा सुविधा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. सफाई कर्मचारी यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. मुंबई शहरात राबवले जाणारे स्वच्छता अभियान आता राज्यात सर्वत्र नेले जाणार आहे. हे अभियान आपल्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे राबवा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विविध लोकप्रतिनिधींना केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आमदार विद्या ठाकूर, आशिष शेलार, यामिनी जाधव, भारती लव्हेकर, प्रकाश सुर्वे, मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, कालिदास कोळंबकर यांच्याशी संवाद साधला.तत्पूर्वी महापालिका आयुक्त आय. एस. चहल यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी मुंबई शहरात राबवल्या जात असलेल्या डीप क्लीन ड्राईव्हबाबत माहिती दिली. यावेळी स्वच्छता कर्मचारी संदीप पवार, शीला जाधव, मच्छिंद्र सावंत, स्वप्नील शिरवाळे, अर्चना मोरे यांचा सत्कार करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त सुधाकर शिंदे यांनी आभार मानले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वच्छता कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. स्वच्छता कामात उपयोगी ठरणार्या वाहनांच्या संचलनास हिरवा झेंडा दाखवून सुरवात केली.

# 'इस्माईलसाहेब मुल्ला जीवनगौरव' पुरस्काराचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते वितरण




सातारा दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- 'इस्माईलसाहेब मुल्ला जीवन गौरव' पुरस्काराचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते राज्याचे माजी महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांना प्रदान करण्यात आला.

एक लाख रुपये, शाल, श्रीफळ व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हॉइस चेअरमन भगीरथ शिंदे, संघटक अनिल पाटील, कायदे सल्लागार दिलावर मुल्ला, सचिव विकास देशमुख आदी उपस्थित होते.

सहकार मंत्री श्री. वळसे पाटील म्हणाले, ॲड. आशुतोष कुंभकोणी यांनी शासनाच्या विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये योग्य बाजू मांडल्यामुळे शासनाच्या बाजूने निकाल लागले आहेत. त्यांना इस्माईल साहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद होत असल्याचे सांगितले.

बहुजनांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून रयत शिक्षण संस्थेची स्थापना स्वर्गीय कर्मवीर भाऊराव अण्णा पाटील यांनी केली. त्यांनी लावलेल्या वृक्षाचा वटवृक्ष झाला असून यामध्ये इस्माईल साहेब मुल्ला यांचेही मोठे योगदान लाभले आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

ॲड. कुंभकोणी यांची इस्माईल साहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कारासाठी निवड होऊन प्रदान होत असल्याने या पुरस्काराची उंची वाढली आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'कमवा व शिका' योजना त्यांच्या शिक्षण संस्थेत सुरू केली. यामुळे मुले स्वाभिमानाने शिक्षण घेऊ लागली. त्याचबरोबर त्यांनी वसतिगृहे निर्माण करून मुलांच्या शिक्षणाबरोबर राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली. रयत शिक्षण संस्थेच्या शाळा, महाविद्यालयांमध्ये सुमारे चार लाख ५२ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ही संस्था आशियातील सर्वात मोठी संस्था आहे.

ॲड. कुंभकोणी यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करून रयत शिक्षण संस्थेला पाच लाख रुपयांची देणगीही यावेळी दिली. या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेमधील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जे. जे. रुग्णालयातील अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे काम तातडीने पूर्ण करावे -मंत्री हसन मुश्रीफ

मुंबई दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सर ज.जी. समूह रुग्णालयाच्या आवारातील अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी नवीन बहुमजली इमारतीचे काम ऑगस्ट २०२४ पूर्वी पूर्ण करण्यात यावे. या दृष्टीने सुरु असलेल्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा दर १५ दिवसांनी घेण्यात यावा, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या विविध विषयांबाबत मंत्री श्री. मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे आयुक्त राजीव निवतकर आदी प्रत्यक्षात, तर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार डॉ. बालाजी किणीकर, विविध जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिष्ठाता हे दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या नवीन बांधकामांबाबत आढावा मंत्री श्री. मुश्रीफ यांनी घेतला. यामध्ये सातारा, जळगाव, सिंधुदुर्ग, नाशिक येथील महाविद्यालय, रुग्णालय, अधिष्ठाता व डॉक्टारांची निवासस्थाने, विद्यार्थी वसतिगृहांची कामे प्रगतिपथावर असून याबाबत सादरीकरण करण्यात आले. तसेच अंबरनाथ, पालघर, भंडारा, गडचिरोली, जालना येथील नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी जागांची उपलब्धता, त्यासाठी शासकीय जमिनींचे हस्तांतरण, निधी वितरण यासाठी आढावा घेऊन संबंधितांना निर्देश देण्यात आले. सर ज.जी. रुग्णालय आणि ग्रॅण्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवासी डॉक्टरांनी सुरु केलेल्या संपाबाबत मंत्री श्री. मुश्रीफ यांच्यासमवेत मार्ड संघटनेच्या प्रतिनिधींची चर्चा झाली. याप्रसंगी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर संप मागे घेण्यात आला असल्याचे सांगण्यात आले. विभागातील ४,४९६ तांत्रिक व अतांत्रिक पदांची भरती प्रक्रिया केली जात असून पात्र ठरलेल्या उमेदवारांना लवकरात लवकर नियुक्ती आदेश दिले जावेत, अशी सूचना यावेळी करण्यात आली.

# जे. जे. रुग्णालयातील अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे काम तातडीने पूर्ण करावे -मंत्री हसन मुश्रीफ

मुंबई दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सर ज.जी. समूह रुग्णालयाच्या आवारातील अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी नवीन बहुमजली इमारतीचे काम ऑगस्ट २०२४ पूर्वी पूर्ण करण्यात यावे. या दृष्टीने सुरु असलेल्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा दर १५ दिवसांनी घेण्यात यावा, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या विविध विषयांबाबत मंत्री श्री. मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे आयुक्त राजीव निवतकर आदी प्रत्यक्षात, तर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार डॉ.



बालाजी किणीकर, विविध जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिष्ठाता हे दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या नवीन बांधकामांबाबत आढावा मंत्री श्री. मुश्रीफ यांनी घेतला. यामध्ये सातारा, जळगाव, सिंधुदुर्ग, नाशिक येथील महाविद्यालय, रुग्णालय, अधिष्ठाता व डॉक्टारांची निवासस्थाने, विद्यार्थी वसतिगृहांची कामे प्रगतिपथावर असून याबाबत सादरीकरण करण्यात आले. तसेच अंबरनाथ, पालघर, भंडारा, गडचिरोली, जालना येथील नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी जागांची उपलब्धता, त्यासाठी शासकीय जमिनींचे हस्तांतरण, निधी वितरण यासाठी आढावा घेऊन संबंधितांना निर्देश देण्यात आले.

सर ज.जी. रुग्णालय आणि ग्रॅण्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवासी डॉक्टरांनी सुरु केलेल्या संपाबाबत मंत्री श्री. मुश्रीफ यांच्यासमवेत मार्ड संघटनेच्या प्रतिनिधींची चर्चा झाली. याप्रसंगी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर संप मागे घेण्यात आला असल्याचे सांगण्यात आले. विभागातील ४,४९६ तांत्रिक व अतांत्रिक पदांची भरती प्रक्रिया केली जात असून पात्र ठरलेल्या उमेदवारांना लवकरात लवकर नियुक्ती आदेश दिले जावेत, अशी सूचना यावेळी करण्यात आली.

# खेळाडूंनी देशाचे नाव उज्वल करावे -केंद्रीय राज्यमंत्री डॉ.भारती पवार

नाशिक दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विद्यार्थी ही राष्ट्राची संपत्ती आहे. खिलाडूवृत्ती जोपासलेली व्यक्ती आयुष्यात कधीच खचून जात नाही तर सातत्याने पुढे जाते. विद्यार्थ्यांनी विविध खेळांतून नवनवीन कौशल्ये व प्राविण्य आत्मसात करावे. यासोबतच सांघिक भावना वृद्धिंगत करून देशाचे नाव उज्वल करावे, असे आवाहन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण, आदिवासी विकास राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी केले. येथील गरूड झेप अकॅडमी, दुगाव येथील प्रांगणात आदिवासी विकास विभागाच्या एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूलच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२३-२४ च्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.



यावेळी आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त नाशिक संदिप गोलाईत, तुषार माळी, सहसंचालक हितेश विसपुते, उपायुक्त संतोष ठुबे, विनिता सोनवणे यांच्यासह क्रीडा शिक्षक, क्रीडा प्रशिक्षक, राज्यभरातून आलेले खेळाडू, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री डॉ. पवार म्हणाल्या की, केंद्र व राज्य शासनाने खेळांवर विशेष लक्ष दिले आहे. विद्यार्थ्यांचा खेळातील सहभाग वाढावा, उत्तम खेळाडू तयार व्हावेत, राज्यासोबतच देशाचे प्रतिनिधीत्व करून खेळाडूंनी ऑलिम्पिक सारख्या स्पर्धांतून खेळाडूंनी आपल्या राष्ट्राचे नाव उज्वल करावे हाच यामागील हेतू आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही खेलो इंडियाचा मंत्र देवून वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धांच्या आयोजनातून खेळाडूंचे मनोबल वाढविले आहे. खेळात मेहनत व एकाग्रता हे गुण महत्त्वाचे असून यांचा उपयोग खेळासोबतच अभ्यासातही विद्यार्थ्यांना होतो. विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून वेगवेगळ्या राज्यात जाण्याची संधी मिळते त्यादृष्टीने हिंदी व इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व विद्यार्थ्यांनी वाढविण्यासोबतच इतर भाषा ही शिकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूलमधून सीबीएससी बोर्डच्या माध्यमातून निश्चितच याकडे लक्ष दिले जात आहेत. स्पर्धेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा झाल्यानंतर नाशिकच्या संस्कृतीचे दर्शन करावे असे सांगुन 'ना हारना जरुरी है, ना जितना जरूरी है, ये जिंदगी एक खेल है, इसे खेलना जरूरी है' अशा शब्दात विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवत शुभेच्छा दिल्या.

अपर आयुक्त श्री. माळी यांनी प्रस्ताविकादरम्यान सांगितले की, २७ ते २९ डिसेंबर या दरम्यान होणाऱ्या स्पर्धेसाठी ३७ एकलव्य स्कूलमधून ८६५ मुले व ८६५ मुली असे सुमारे १७३० विद्यार्थी १० क्रीडा प्रकारात सहभागी होत असून ३ वेगवेगळ्या मैदानात या स्पर्धा होणार आहेत.

प्रारंभी दीपप्रज्वलन, क्रीडा ज्योत प्रज्वलन व खेलध्वजाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते झाले. मंत्री डॉ. पवार यांनी खेळाडूंसह रंगीत फुगे हवेत सोडून राज्यस्तरीय स्पर्धांचे उद्घाटन केले.

# ग्रामीण नागरिकांच्या जीवनात परिवर्तन आणण्याचे केंद्र शासनाचे काम -केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय कुमार मिश्रा

सातारा दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विकसित भारत यात्रेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचे काम केंद्र शासन करत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय कुमार मिश्रा यांनी फलटण तालुक्यातील विडणी येथे विकसित भारत संकल्प यात्रेच्या कार्यक्रमप्रसंगी केले.

याप्रसंगी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, प्रांताधिकारी सचिन ढोले, तहसीलदार अभिजीत जाधव आदी उपस्थित होते. यावेळी श्री. मिश्रा यांच्या हस्ते केंद्र शासनाच्या योजनांचा लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

केंद्र शासनातर्फे अनेक लोककल्याणकारी योजना राबविल्या जात असून त्या सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, असे सांगून केंद्रीय गृह राज्यमंत्री श्री. मिश्रा म्हणाले, प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून गरजूंना घरे उपलब्ध करून देण्यात आली. शौचालय नसलेल्यांना बांधकामासाठी अनुदान देण्यात आले. जल जीवन मिशनच्या माध्यमातून प्रत्येक घराला नळ जोडणीच्या माध्यमातून शुद्ध पिण्याचे पाणी देण्याचे काम देशात मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

विकसित भारत संकल्प यात्रा ही देशातील प्रत्येक ग्रामीण भागात जात आहे. ज्या पात्र लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ मिळाला नाही अशा लाभार्थ्यांना त्यांच्या गावातच विविध योजनांचा लाभ देणे हा यात्रेचा मुख्य उद्देश असून यात्रा जात असलेल्या प्रत्येक गावात अशा नागरिकांचा शोध घेऊन त्यांना लाभ दिला जात आहे. नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री. मिश्रा यांनी यावेळी केले.

खासदार श्री. नाईक निंबाळकर म्हणाले, केंद्र शासनाच्या योजनांचा सर्वसामान्यांना मोठ्या प्रमाणात लाभ झाला आहे. कोविड काळात मोफत अन्नधान्य, सर्वांना मोफत कोविड प्रतिबंधक लस देण्यात आली. केंद्र व राज्य शासनाच्या प्रभावीपणे राबविल्या जात असलेल्या योजनांमुळे आज देशाबरोबर ग्रामीण भागाचाही मोठ्या प्रमाणात विकास झाल्याचे यावेळी सांगितले.

यात्रेमध्ये पंतप्रधान आवास योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत कार्ड, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, किसान क्रेडिट कार्ड, सुरक्षा विमा योजना, जीवनज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना, बचत गटांना अर्थसहाय्य, संजय गांधी निराधार योजना आदी विविध योजनांच्या लाभासह माहिती देण्याबरोबर अर्ज भरून घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

या यात्रेसाठी एलईडी चित्ररथाच्या माध्यमातून स्क्रीनवरून योजनांच्या ध्वनीचित्रफिती प्रसारित करण्यासह योजनांची माहिती देणाऱ्या हस्तपत्रिका वितरीत करण्यात आल्या. यावेळी उपस्थितांनी संकल्प शपथ घेतली. यावेळी विविध विभागांचे अधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गरजूंना त्यांच्या हक्काची उत्तम दर्जाची घरे मिळवून देण्यास कटिबद्ध -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ठाणे दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- धोकादायक इमारतींमधील लोकांना त्यांच्या हक्काच्या चांगल्या घरात नेईन तो दिवस माझ्यासाठी महत्त्वाचा असून गरजूंना त्यांच्या हक्काची उत्तम दर्जाची घरे मिळवून देण्यास मुख्यमंत्री या नात्याने मी कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

२२ नंबर सर्कल, किसननगर या भागातील यु.आर.सी. क्र.१ व २ येथे आशिया खंडातील सर्वात मोठ्या महत्वाकांक्षी नागरी पुनरुत्थान (क्लस्टर) पुनर्विकास योजनेतील नवीन प्रकल्पाचे भूमिपूजन त्याचबरोबर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, येऊर येथील नेचरपार्क व इतर विविध विकास कामांचा ई-शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक एस. व्ही. रामाराव, मुख्य वनसंरक्षक के. प्रदीपा, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे संचालक श्री. मल्लिकार्जुन, ठाणे महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर, सह व्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे, ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी व प्रशांत रोडे, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, मिनाक्षी शिंदे आणि माजी नगरसेवक, नगरसेविका, आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, क्लस्टरसाठी अनेक संघर्ष करावे लागले. साईराज बिल्डिंगची दुर्घटना अजूनही लक्षात आहे. त्यातील १८ जण मृत्युमुखी पडले, ही घटना माझ्या मनाला चटका लावून गेली. धोकादायक इमारती सर्वांनाच काळजीत टाकणाऱ्या असतात. या पार्श्वभूमीवर ही योजना राबविण्याचा संकल्प केला. काही इमारती अनधिकृत जरी असल्या तरी त्यातील जिवंत माणसे, त्यांचा जीव महत्त्वाचा, ही माणुसकीची भावना महत्त्वाची, या भावनेतूनच क्लस्टर योजनेचा जन्म झाला. क्लस्टर योजनेत काही त्रुटी होत्या. मात्र देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री असताना त्या त्रुटी दूर करण्यात त्यांनी मोलाचे सहकार्य केले. महापालिका आयुक्त, सिडको व्यवस्थापकीय संचालक, जिल्हाधिकारी आणि वनविभाग यांनी संयुक्तपणे ही योजना यशस्वीपणे पूर्णत्वास आणावी.

ते म्हणाले, या योजनेतील पुढील टप्प्यातील कामांकरिता आपल्याला वेगवेगळे भूखंड मिळत आहेत. क्लस्टर पुनर्विकास योजनेच्या पहिल्या टप्प्यात साडेदहा हजार घरांचे काम पूर्णत्वास जाणार आहे, पुढील काम हे दोन टप्प्यातच पूर्ण करण्याचे मी निर्देश दिले आहेत. क्लस्टर योजनेसाठी पूर्वी काम केलेल्या कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी कटिबद्ध आहे. पंधराशे हेक्टर भूखंडावर होणारा हा क्लस्टर पुनर्विकास प्रकल्प भारतातीलच नव्हे तर आशियातील पहिला इतका मोठा क्लस्टर पुनर्विकास प्रकल्प आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेबांची शिकवण समाजासाठी जगणे, ही होती. हीच शिकवण घेऊन मी आता जगतोय. मुख्यमंत्रीपदाचा उपयोग सर्वसामान्यांचे जीवन बदलण्यासाठी करण्याचा प्रयत्न करतोय.

डीप क्लीन ड्राईव्हविषयी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, हे अभियान यशस्वी होण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे. टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात हे अभियान राबविले जाणार आहे आणि हे केवळ एक-दोन दिवसासाठी नव्हे तर नियमितपणे राबविले जाणार आहे. सर्वांनाच नियमित स्वच्छतेची सवय व्हायला हवी.

केंद्र सरकारच्या मदतीमुळे राज्यातील अनेक प्रकल्प मार्गी लागत आहेत, याबद्दल केंद्र शासनाचे आभार मानून मुख्यमंत्री म्हणाले की, ''आनंदवन'' ही संकल्पना मानवी जीवनासाठी अत्यंत उपयुक्त अशी संकल्पना आहे. या योजनेंतर्गत ठाण्यातील पहिल्या टप्प्यात २७ किलोमीटर आणि ५०० मीटर रुंदीचा श्रीनगर ते गायमुख या भागात हा प्रकल्प राबविला जाणार आहे. या माध्यमातून जास्तीत जास्त वृक्षारोपण, ग्रीन पॅच, ऑक्सिजन पार्क, अर्बन फॉरेस्ट हे उपक्रम राबविले जाणार आहेत. शासनाकडून राज्यात बांबू लागवडीसाठी प्रोत्साहन दिले जात आहे.

या प्रकल्पात बांधकाम करणाऱ्या शिर्के कन्ट्रक्शन कंपनीचे कौतुक करताना मुख्यमंत्र्यांनी त्यांना सांगितले की, लोकांना कमीत कमी वेळेत उत्तम दर्जाची घरे बांधून द्यावीत. नुसत्या इमारती उभ्या न करता नियोजित शहर निर्माण करायचे आहे. येथील लोकांना आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा मिळायला हव्यात. क्लस्टर हा विषय सर्वांच्या जिव्हाळ्याचा असून गरजूंना त्यांच्या हक्काची उत्तम दर्जाची घरे मिळवून देण्यास मुख्यमंत्री या नात्याने मी




कटिबद्ध असून आनंदवन, क्लस्टर आणि डीप क्लीन ड्राईव्ह या अभियानाचा परिणाम निश्चितच येत्या काळात सकारात्मक आणि विकासात्मक दृष्टीने दिसून येईल. भविष्यात ठाण्यातील व राज्यातील इतर शहरांचाही क्लस्टर पुनर्विकासाच्या माध्यमातून विकास केला जाईल. सर्वांच्या सहकार्याने ठाणे शहर, ठाणे जिल्हा अन् राज्याचाही सर्वांगीण विकास करावयाचा आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी प्रास्ताविक करताना क्लस्टर पुनर्विकास योजनेबद्दलची माहिती सांगितली. तसेच ''आनंदवन'' Forest in the City आणि क्लस्टर समूह विकास योजना'' याबाबतची चित्रफीत दाखविण्यात आली. शेवटी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# ऊर्जा क्षेत्रातील पायाभूत विकासाचा रोडमॅप सादर करण्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

मुंबई दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना राज्याच्या सर्वांगीण विकासात महत्वाचे क्षेत्र असणाऱ्या ऊर्जा विभागाची भूमिका मोलाची असणार आहे. त्यामुळे ऊर्जा विभागाच्या तीनही कंपन्यांनी ऊर्जा क्षेत्रातील पायाभूत विकासाचा सन २०३५ पर्यंतचा एकत्रित रोडमॅप पुढील तीन महिन्यांत सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



सह्याद्री अतिथीगृहात उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या सूत्रधारी कंपनीच्या तीनही संचालक मंडळाची बैठक आज झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. या बैठकीला प्रधान सचिव तथा महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी अनबलगन, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीवकुमार, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक उपस्थित होते.

राज्यात औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढणार आहे हे सांगून श्री. फडणवीस म्हणाले, महाजेनकोने सर्व अंगाने ऊर्जा निर्मिती वाढविण्यासाठी अधिक वेगाने काम करणे आवश्यक आहे. कोराडी, पारस व इतर ठिकाणी ऊर्जा निर्मिती वाढविण्यासाठी व्यवहार्यता तपासावी. आपल्याला निरंतर आणि गुणवत्तापूर्ण वीज कशी देता येईल याचे नियोजन आणि अंमलबजावणी करणे महत्वाचे आहे. औद्योगिक क्षेत्रातील यंत्रे ही खूप महागडी व जास्त वीज घेणारी असतात. त्यामुळे त्यांना अखंडित वीज पुरवठा करणे आवश्यक ठरते.

अन्यथा ही यंत्रे निकामी होतात.

त्याचबरोबर भूमिगत वितरण प्रणाली करण्यावर भर द्यावा. प्रथम २५ टक्के भूमिगत प्रणाली करुन त्याचा अभ्यास करावा. वितरण खर्च किती वाढतो, वीज गळती किती कमी होते याचा अभ्यास करुन त्याअनुषंगाने नियोजन करावे.

जादा भार असणाऱ्या वितरण वाहिन्या कमी करण्यासाठी दीर्घकालीन आणि कालबद्ध योजना आखावी. त्याचबरोबर असुरक्षित विद्युत ढाचे दूर करण्यासाठी सीएसआर निधी वापरावा, जेणेकरून यामुळे होणारे मृत्यू कमी करता येतील, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

# बाबा जोरावरसिंग, बाबा फतेहसिंग यांच्या शौर्याला अभिवादन

नवी दिल्ली दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- देशात २६ डिसेंबर हा दिवस वीर बाल दिवस म्हणून पाळला जातो. हा दिवस गुरु गोबिंद सिंगांचे सुपूत्र साहिबजादा बाबा जोरावरसिंग आणि साहिबजादा बाबा फतेहसिंग यांच्या पराक्रम आणि बलिदानाची आठवण म्हणून पाळला जातो. यानिमित्त महाराष्ट्र सदनात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कॉपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्रधान सचिव व निवासी आयुक्त रुपिंदर सिंग यांनी बाबा जोरावरसिंग व बाबा फतेहसिंग यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार यांच्यासह महाराष्ट्र सदनातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. त्यानीही यावेळी प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

महाराष्ट्र परिचय केंद्रात आयोजित कार्यक्रमात बाबा जोरावरसिंग व बाबा फतेहसिंग यांना अभिवादन करण्यात आले. परिचय केंद्राच्या उपसंचालक (माहिती) अमरज्योतकौर अरोरा यांनी बाबा जोरावरसिंग व बाबा फतेहसिंग यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित कर्मचा-यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

पान १ वरून

## नवीन मोटार वाहन कायद्याविरोधात...

विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आले. मनमाड डेपोतून सोमवारी एकही टँकर बाहेर पडले नाही. यामुळे येथून होणारा इंधनाचा पुरवठा पूर्णतः विस्कळीत झाला आहे. टँकर चालकांचा हा संप मिटला नाही. तर राज्यात पेट्रोल - डिझेलचे वांदे होण्याची शक्यता आहे.

केंद्राच्या कथित वादग्रस्त कायद्याला बीपीसीएल, एचपीसीएल व इंडिया ऑयल या तिन्ही सरकारी तेल कंपन्यांच्या टँकर चालकांनी विरोध केला आहे. त्यांनी हा कायदा रद्द करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणी त्यांनी घोडबंदर येथील फाऊन्टन हॉटेलजवळ चक्का जाम आंदोलन केले. यामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली. टँकर चालकांच्या या संपामुळे मराठवाड्यासह विदर्भ, खान्देश, उत्तर महाराष्ट्रातील पेट्रोल पंप कोरडे ठाक पडण्याची शक्यता आहे.

नागपूर-भंडारा राष्ट्रीय महामार्गावर ट्रक चालकांनी चक्काजाम आंदोलन सुरू केले आहे. अपघातानंतर जखमींना मदत न करता पळून जाणाऱ्या वाहन चालकांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल, या केंद्र सरकारच्या नव्या निर्णयाच्या विरोधात ट्रकचालक हे चक्काजाम आंदोलन करत आहेत. या कायद्यात वाहन चालक खास करून ट्रक चालकांविरोधात एकतर्फी कारवाईची तरतूद करण्यात आली असल्याचा आरोप होत आहे. अपघाताच्या स्थळावर थांबल्यावर चूक नसतांना देखील लोक ट्रकचालकाला मारहाण करतात. त्यामुळे आपला जीव वाचवण्यासाठी ट्रकचालक पळून जातात. मात्र, नंतर ते पोलिसांकडे जाऊन माहिती देतात. त्यामुळे हा कायदा वाहन चालकांच्या विरोधात असल्याची प्रतिक्रिया देत ट्रकचालकांनी चक्काजाम आंदोलन सुरू केले आहे. याचवेळी नागपूरच्या चौदा मैल येथे ट्रकचालकांनी कोलकत्ता-नागपूर- मुंबई व नागपूर- भोपाळ राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला आहे.

केंद्र सरकारने आणलेल्या नवीन मोटार वाहन कायद्याला देशभरात विरोध होत असून, टँकरचालकांनी थेट संपाची हाक दिली आहे. हा नवीन कायदा रद्द करा अशी मागणी करत बीपीसीएल, एचपीसीएल आणि इंडियन ऑइल या तिन्ही कंपन्यांचे पेट्रोल-डिझेल पुरवठा करणाऱ्या टँकरचालकांनी तीन दिवसीय संप पुकारला आहे. आज घोडबंदर येथूल फाऊन्टन हॉटेलजवळ ट्रक चालकांनी चक्का जाम केला आहे. त्यामुळे तेथे वाहतुक कोंडी झाली आहे. वाहतुक पोलीस वाहतुक कोंडी सोडवण्याचा प्रयत्न करत आहे.

केंद्र सरकारने आणलेल्या नवीन मोटार वाहन कायद्यानुसार यापुढे अपघातास जबाबदार ट्रकचालकास १० वर्षांच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. सोबतच सात लाख रुपये दंड देखील आकाराला जाणार आहे. दरम्यान, याच कायद्याला देशभरात विरोध होत असून, चालकांनी थेट संपाची हाक दिली आहे. याचे अनुषंगाने गोंदिया शहरातील कुडवा चौक येथे आज नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच टायर जाळून केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला. यावेळी वाहतूक विस्कळीत होऊ नये यासाठी रामनगर पोलिसांनी १३ चालकांना ताब्यात घेतले आहे.

बुलढाणा जिल्ह्यात देखील ट्रक चालक आक्रमक होतांना पाहायला मिळत आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावर मलकापूर-घोडसगाव नजिक रस्त्यावर टायर जाळून महामार्ग अडवण्यात आला आहे. गेल्या एक तासांपासून महामार्ग अडवून वाहन चालकांची घोषणाबाजी सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. अपघात झाल्यानंतर पळून जाणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याच्या नवीन नियमाला वाहन चालकांनी यावेळी विरोध केला आहे. या आंदोलनामुळे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या असून, पोलिस आंदोलनस्थळी पोहचले आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात देखील या आंदोलनाचे पडसाद उमटताना पाहायला मिळत आहे. केंद्र सरकारच्या नवीन कायद्या विरोधात अजिंठ्यातील शिवना येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. सोबतच पैठण तालुक्यातील बिडकीन येथील पोलीस ठाण्यात देखील ट्रक चालकांच्या वतीने निवेदन देण्यात आले. तसेच, यावेळी जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली.

## जपान शक्तीशाली भूकंपाने हादरला;...

इतकी होती.

भूकंपानंतर देशात अडकलेल्या भारतीय नागरिकांसाठी हेल्पलाईन नंबर जारी केले आहेत. याशिवाय दूतावासाने आपत्कालीन नियंत्रण कक्षही स्थापन केले असल्याची माहिती देण्यात आलीये. जपानमधील भारतीय दूतावासाने ट्विट करत याविषयी माहिती दिली. यामध्ये त्यांनी म्हटलं की, १ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या भूकंप आणि त्सुनामीच्या पार्श्वभूमीवर भारतीय दूतावासाने आपत्कालीन नियंत्रण कक्ष स्थापन केले आहे. तसेच कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी हेल्पलाईन नंबर आणि ईमेल आयडीवर संपर्क साधता येईल.

भारतीय दूतावासाकडून काही नंबर देण्यात आले आहेत. त्यामध्ये +८१-८०-३९३०-१७१५ (याकुब टॉपनो), +८१-७०-१४९२-००४९ (अजय सेठी), +८१-८०-३२१४-४७३४ (डी. एन. बर्नवाल), +८१-८०-६२२९-५३८२ (एस. भट्टाचार्य), +८१-८०-३२१४-४७२२ (विवेक राठी) हे काही क्रमांक शेअर करण्यात आले आहेत. या क्रमांकावरुन कोणत्याही प्रकारची मदत हवी असल्यास तातडीने संपर्क साधता येऊ शकतो.

## इंडिया आघाडीची दारं सध्या तरी...

एक मोठा रोल करतील. संविधानाच्या सुरक्षेसाठी प्रकाश आंबेडकर आमच्यासोबत येतील.,गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र आणि देशाच्या समाजकारणात आंबेडकर कुटुंबीयांनी मोठं योगदान दिलंय. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनीही चांगल्या पद्धतीने काम केलंय. संविधान आणि देश वाचवण्यासाठी प्रकाश आंबेडकरांची गरज आहे. संविधानासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी आम्ही सर्वांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतलाय, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या

प्रकाश आंबेडकर शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चांगला समन्वय आहे, प्रकाश आंबेडकर उद्धव ठाकरे यांचा संवाद आहे. आंबेडकर आणि शरद पवार यांचा ही संवाद आहे. महाविकास आघाडीमध्ये त्यांना स्थान राहावं यासाठी आमच्या चर्चा सुरू आहेत. इंडिया आघाडी हा पुढला विषय आहे आम्ही महाराष्ट्राचा विचार करत आहोत. महाराष्ट्रामध्ये ४८ पैकी किमान ४० जागा आम्ही जिंकाव्यात ही प्रकाश आंबेडकरांची भूमिका आहे. ही शरद पवारांची, उद्धव ठाकरे आणि राहुल गांधी यांची भूमिका आहे. त्याच्यामुळे वंचित बहुजन आघाडी आणि महाविकास आघाडी यांच्यामध्ये उत्तम समन्वय आहे आणि उत्तम चर्चा सुरू आहे, असे राऊत म्हणाले.

## छगन भुजबळांना वेड लागलंय;...

वेड लागला आहे. परंतु, लोकशाहीमध्ये त्यांना देखील सभा घेण्याचा अधिकार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत. बीडमध्ये एका लग्न समारंभाच्या कार्यक्रमासाठी मनोज जरांगे पाटील हे बीड शहरात आले होते. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी २० जानेवारी मनोज जरांगे मुंबईला पायी दिंडी काढणार आहे. आंतरवाली सराटी ते मुंबई अशी ही पायी दिंडी असणार आहे. दरम्यान, आंतरवाली येथून मुंबईसाठी तीन कोटी मराठा बांधव हे आरक्षणाच्या मागणीसाठी पाय निघालेल्या रॅलीमध्ये सहभागी होतील असे देखील मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत.

काही दिवसांपूर्वी मराठा आरक्षणाच्या आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांची बीडमध्ये सभा झाली होती. त्या सभेमध्येच मुंबईला जाण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर आता छगन भुजबळ यांची देखील बीडमध्येच महासभा होणार असून, त्या सभेमध्ये छगन भुजबळ काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे. यावर प्रतिक्रिया देतांना जरांगे पाटील यांनी म्हटले आहे की, छगन भुजबळ यांना वेड लागले असून, लोकशाहीने ते सभा घेऊ शकतात,'' अशी जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

## देवेंद्र फडणवीस गृहमंत्री...

सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले.

लोकसभेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा फॉर्म्युला ठरला आहे.फक्त त्यावर शिक्कामोर्तब होणे बाकी आहे. अनेक महिन्यांपूर्वीचं हा फॉर्म्युला दिल्लीत ठरला होता. लवकरच महाविकास आघाडी जागावाटपाबाबत निर्णय घेईल, असेही सुळे यांनी स्पष्ट केले. मी लहान कार्यकर्ती आहे. सध्या तरी जनतेची सेवा आणि लोकसभेतील सहभाग यावरच माझा सहभाग आहे, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

महाराष्ट्रातील प्रकल्प दुसऱ्या राज्यात नेले जात आहेत. गुंतवणूक होत नाहीये. हा महाराष्ट्रावर अन्याय आहे. यावर महाराष्ट्रातील ट्रीपल इंजिन सरकार गप्प आहे. खोके सरकारकडे २०० आमदार असूनही महाराष्ट्रावर होणाऱ्या अन्यायावर कोणीही बोलत नाही,अशी टीका सुळे यांनी केली.

सुळे म्हणाल्या, जगभरातील अनेक देशांमध्ये २०२४ मध्ये निवडणुका होणार आहेत. आपल्या देशातील निवडणुका पारदर्शकपणे आणि कोणत्याही दडपशाही विना पार पडल्या पाहिजेत. हे वर्ष सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या अतिशय महत्वाचं वर्ष आहे. ईव्हीएमबाबत विदेशात शंका घेतल्या जात असतील तर पीएम मोदींनी सर्वपक्षीय बैठक बोलावून यावर बोलायला हवे. ते फक्त भाजपचे नाहीत तर देशाचे पंतप्रधान आहेत. कॉपी करुन पास होण्यापेक्षा अभ्यास करुन पास झालेले केव्हाही चांगले असते, असा टोलाही ईव्हीएमवरुन सुळे यांनी लगावला.

## सुप्रिया ताई १५ वर्ष दादांमुळे...

मतदारसंघामध्ये अजित पवार राष्ट्रवादी गट आणि महायुतीचा उमेदवार निवडून येईल.

अजित पवार महायुतीत गेल्यापासून ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील, असा दावा सातत्याने वेगवेगळ्या पक्षातील किंवा त्यांच्याच नेत्यांकडून केला जात आहे. अजित पवारांनी विरोधी पक्षांमधील नेते असो अथवा अजित पवारांचे समर्थक, अनेकांनी अजित पवार लवकरच मुख्यमंत्री होतील असा दावा केला आहे. आता चर्चांना राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या रुपाली चाकणकर यांनी केलेल्या वक्तव्यामुळे पुन्हा उधाण आले आहे. अजित पवार मुख्यमंत्री व्हावे ही आमची इच्छा आहे, असे वक्तव्य रुपाली चाकणकर यांन केले आहे. अजित दादांना मुख्यमंत्री होताना पाहायचं असेल तर आम्हला काम करावं लागेल. आमचं स्वप्न आहे त्यासाठी आम्ही प्रयत्न करू दादा मुख्यमंत्री व्हावं हे सर्वांची इच्छा आहे, असेही रुपाली चाकणकर म्हणाल्या.

रुपाली चाकणकर म्हणाल्या, अजित पवारांनी २०२३ ला निर्णय घेतला तो विकासासाठी घेतला आहे. अनेक चांगले निर्णय घेतले अजित पवारांनी घेतले आहे. १८ जानेवारीला मुबंईत महिला मेळावा आयोजित केला आहे. तृतीयपंथीयासाठी ससूनमध्ये स्वतंत्र वॉर्ड करणार आहे. भावनिक राजकारण जास्त वेळ चालत नाही. येणाऱ्या लोकसभा- विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीचा विजय होणार आहे. प्रत्येकाची लढण्याची इच्छा असते,स्पर्धक असतात त्यामुळे खडकवासलामध्ये अनेक इच्छुक आहेत.

## महायुतीत अद्याप जागावाटपाची चर्चा...

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, आम्ही ४५ प्लस जागा जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवूनच लोकसभा निवडणूक लढवणार आहोत. महायुतीच्या बैठकीसाठी तिन्ही पक्षांतील प्रमुख नेते, प्रदेशाध्यक्ष हे संबंधित जिल्ह्यांमध्ये उपस्थित राहतील. प्रत्येक जिल्ह्यामध्ये एकाच वेळेला बैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे. जागावाटपाची चर्चा ही यथावकाश आणि योग्य वेळी करण्यात येईलच. पण आम्ही एका गोष्टीवर ठाम आहोत की आम्ही ४५ प्लस उद्दिष्ट ठरवूनच लोकसभा निवडणूक लढवणार आहोत.

महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. महायुतीत भाजप, शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी (अजित पवार गट) हे ३ मोठे पक्ष आहेत. तर महाविकास आघाडीत काँग्रेस, शिवसेनेचा ठाकरे गट व राष्ट्रवादीचा शरद पवार गट आहे. पुढील काही दिवसांत प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वातील वंचित बहुजन आघाडीचा यात समावेश होऊ शकतो. तूर्त या आघाडीला मविआत समाविष्ट करण्याच्या मुद्यावर चर्चा सुरू आहे.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा नाचनवेलला मोर्चा, मागण्या मान्य न झाल्यास मुंबईत आंदोलनाचा इशारा

नाचनवेल दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-नाचनवेल येथील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढून एकात्मिक बालविकास सेवा आयुक्त रुबल अग्रवाल यांनी काढलेल्या आदेशाची होळी करून निषेध केला. या वेळी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी नाचनवेल-कोपरवेल ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच कासाबाई थोरात व ग्रामविकास अधिकारी मनोहर पवार यांना निवेदन दिले. तालुक्यासह नाचनवेल, कोपरवेल, आडगाव, टाकळी शाहू, मोहरा,डोंगरगाव,आमदाबाद, सारोळा, नादरपूर ,मोहाडी, कवडी वस्ती, शेलाटी वस्ती, बहिरोबा वस्ती, कॉलेज वस्ती असे नाचनवेल बीटमधील ५१ कर्मचारी संपात सामील झालेले आहेत.



शासनाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्या लवकर मान्य कराव्यात, अन्यथा तीन जानेवारी रोजी मुंबई येथे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. या वेळी ग्रामपंचायत सदस्य नरेश वैद्य, अशोक सोनवणे, सुखदानेताई, अंगणवाडी सेविका तारा रोठे, मनीषा चोंधे, लुमावती गायकवाड, शोभा शिंदे, सुमित्रा वाहटुळे, शीला तायडे, मुमताज शेख, मंगल आराक, उषा घोडे, अनिता शेलार, कौशल्य निंभोरे, धुमाळ आदी अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.



**नवीन वर्ष व ख्रिसमस निमित्याने गॉड्स लॅबस जीजस क्राइस्ट चर्च जालना येथे तृतीय पंथांना स्टील डबे व गरिबांना उबदार साजरी वाटून मोठ्या उत्साहात सह साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित फादर जगन्नाथ घोडा फादर चांगदेव गणपती भाकरे कारागृह अधीक्षक कैलास काळे सदर बाजार पोलीस स्टेशन चे पीआय पांडुरंग शिंदे अशोक बनकर संजय अहिरराव महेश धनावत महेंद्र साळवे शेलगावकर भीमराव शेजुळ अरविंद रामफळे विनोद लोंढे रवींद्र लोखंडे अनुष घोरपडे जोसेफ मॅडम डॅनियल सुतार यश भाकरे कल्पना भाकरे सुरेंद्र बेंद्रे तृतीयपंथी प्रिया देशमुख अंजली साठे रवींद्र सुतार व सर्व ख्रिस्ती समाज बांधव दिसत आहे. (छायाचित्र -किरण खानापुरे)**

# आईने गॅसवर ठेवलेले गरम पाण्याचे पातेले अंगावर उलटले; अवघ्या पंधरा महिन्यांच्या चिमुकलीचा मृत्यू

छत्रपती संभाजीनगर दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-एकीकडे संपूर्ण देशभर नवीन वर्षाचे स्वागत केले जात असतांना, दुसरीकडे छत्रपती संभाजीनगर शहरातील घडलेल्या काही दुर्दैवी घटनांनी खळबळ उडाली आहे. आईने गॅसवर ठेवलेले गरम पाण्याचे पातेले अंगावर उलटल्याने अवघ्या पंधरा महिन्यांची चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. शहरातील उस्मानपुरा भागात ही घटना घडली आहे. नुरेन अजिम सय्यद असे मयत चिमुकलीचे नाव आहे. अधिक माहितीनुसार, अजिम सय्यद हे शहरातील उस्मानपुरा भागात राहतात. त्यांना १५ महिन्याची नुरेन नावाची मुलगी होती. दरम्यान, नुरेनाच्या वडिलांसाठी आईने गॅसवर पाणी गरम करण्यासाठी ठेवले होते. मात्र, पाण्याचे पातेले अंगावर पडल्याने नुरेना गंभीर भाजली. आई-वडिलांनी तिला तात्काळ शासकीय घाटी रुग्णालयात दाखल केले. मात्र, शनिवारी सकाळी उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटनेने सय्यद कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. तर, परिसरात या घटनेनंतर हळहळ व्यक्त होत आहे.

दुसऱ्या एका घटनेत, बहिणीकडे राहायला आलेल्या घराच्या पत्र्यावरील बॉल काढण्यासाठी तो छतावर चढला आणि छतावरून मृत भूषण वाढाई गेलेल्या हायटेन्शन विद्युत पुरवठा तारेचा शॉक लागून जागीच दगावला. चिमुकल्याचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला आहे. भूषण वाढाई असे मयत मुलाचे नाव आहे. भूषण वाढाई हा मूळचा वर्धा जिल्ह्यातील आहे. मात्र, शहरातील वाळूज भागातील रांजणगावमध्ये बहिणीच्या घरी तो आला होता. दरम्यान, शेजारच्या मुलांसोबत खेळत असताना तो पत्र्यावरील बॉल काढण्यासाठी चढला असता, हायटेन्शन तारांचा जबर धक्का लागून तो पत्र्यावरून खाली कोसळला. शेजाऱ्यांनी त्याला तत्काळ घाटीत दाखल केले. परंतु, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.या घटनेने देखील परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## गुडघेदुखी, कंबरदुखी, मानक्यांचा त्रास तसेच मानक्यांचे आजार यावर जर्मन टेकनॉलॉजी द्वारा न्युरोथेरेपी तज्ञाकडून ब्रेसने शिबीरात उपचार केले जाणार

जालना दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- ब्राह्मण सभा, रेड स्वस्तिक सोसायटी व लॉयन्स क्लब ऑफ जालना मर्चंटसिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबिरात गुडघेदुखी, कंबरदुखी, मानक्यांचा त्रास तसेच मानक्यांचे आजार यावर जर्मन टेकनॉलॉजी द्वारा न्युरोथेरेपी तज्ञाकडून ब्रेसने उपचार केले जाणार आहेत. या शिबिराचे उदघाटन उद्योगपती कैलाश लोयाजी करणार असून अध्यक्षपदी क्रेडाईचे अध्यक्ष अभय कुलकर्णी हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जालना महानगर पालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, उद्योजक अनिल सोनी, डॉ. प्रकाश सिगेदार, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन राहणार आहेत. कार्यक्रम मंगळवार दि.२ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता ब्राह्मण सभा भवन येथे आहे. कार्यक्रम वेळेवर चालू होणार असून जनतेने या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन बंकट खंडेलवाल, कल्याणराव देशपांडे, पवन देशमुख, संतोष लिंगायत, रमेश देहेडकर, विनोद वीर, डॉ. सुभाष भाले, इंद्रजित जाधव, पवन जोशी, विजय दाड, डॉ. संजय रुईखेडकर, रविंद्र देशपांडे, रामेश्वर अग्रवाल, अनिल तलरेजा, अशोक देशमुख, ऍड. विनोद कुलकर्णी, ऍड. विलास कुलकर्णी यांनी आवाहन केले आहे.




**भवानी नगर सिद्धिविनायक नगर येथील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्याबाबत आयुक्त यांना कळविण्यात आले असून सिद्धिविनायक नगर मधील सर्व लोकांनी एकत्र येऊन अतिक्रमण हटवण्याच्या निर्णय घेतला असून यावेळी शोएब खान एस आय हे स्वत: येऊन सर्व नागरिकांना नोटीस बजावून तीन दिवसाची मुदत दिली असता सर्वांनी होकार दिला व सोमवारपर्यंत आपले अतिक्रमण हटवून याची कबुली दिली यावेळी उपस्थित नागरिक राम राऊत भिकाजी मुळे मोहन राऊत बालाजी चौधरी विष्णू जाधव रामभाऊ देवकर कासाबाई चौधरी संगीता कोकणे मंजुळा जुळे कमळाबाई व इतर दिसत आहे. (छायाचित्र -किरण खानापुरे)**

# रांजणगाव येथे विवाहितेची आत्महत्या

वाळूजमहानगर दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- बत्तीस वर्षी विवाहितेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रांजणगाव (शेणपुंजी) येथील हरी ओमनगरात गुरुवारी (ता.२८) रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास उघडकीस आली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, अर्चना संतोष शिंदे (वय ३२) रा. रुई (बु) ता.नायगा जि.नांदेड (ह.मु हरिओमनगर रांजणगाव, शेणपुंजी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर या महिलेने राहत्या घरी दोरीच्या सहाय्याने छताच्या हुकाला गळफास घेतला. गुरुवारी (ता.२८) रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास हा प्रकार उघडकीस येताच असेल तिला बेशुद्ध अवस्थेत सोपान अशोक कदम व संतोष शिंदे यांनी घाटी दवाखाना अपघात विभागात दाखल केले.

तिला तपासून डॉक्टरांनी सायंकाळी ७.२५ वाजेच्या सुमारास मयत घोषित केले. याप्रकरणी बेगमपुरा घाटी मेडीकल चौकीचे पोलीस नाईक सी.बी.सानप त्यांनी दिलेल्या खबरीवरून वाळुज एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

# रांजणगाव येथे भारतीय स्त्री मुक्ती दिन परिषद

वाळूज महानगर दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- वाळूज परिसरातील रांजणगाव (शेणपुंजी) येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मनुस्मृति दहन दिनानिमित्त भारतीय स्त्री मुक्ती दिन परिषदचे आयोजन शुक्रवारी २९ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्षा लता बामणे होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून राज्य महासचिव अरुंधती शिरसाट, राज्य उपाध्यक्ष सविता मुंढे, मराठवाडा समन्वयक प्रज्ञा साळवे, मुख्य प्रवक्ता सिद्धार्थ मोकळे, तर स्वागताध्यक्ष म्हणून जिल्हा उपाध्यक्ष रत्नमाला पवार व शहराध्यक्ष वंदना नरवडे आदींची उपस्थिती होती.



प्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कर्तुत्ववान महिलाच्या प्रतिमेस बहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या भारतीय स्त्री मुक्ती दिन परिषदेत उपस्थित महिला पदाधिकाऱ्यांनी वंचित बहुजन आघाडी यांच्या विषयी मनोगत व्यक्त करत मनुस्मृतिवर टीका करत भाजपाच्या मोदी सरकारवरताशेरे ओढले.तसेच भारतीय स्त्री मुक्ती दिन परिषदेचे ध्येयधोरणे स्पष्ट करून वेगवेगळे सात ठराव पारित केले. कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष प्रभाकर बकले, योगेश बन, जिल्हा उपाध्यक्ष रूपचंद गाडेकर, नितीन शेजवळ,अलका सुरडकर, सुलोचना साबळे,शितल बनकर, खुशबू शेख,साधना पठारे, संगीता अंभोरे, जया सदावर्ते, सुजाता गायकवाड, पुष्पा घोडके, आशा मोरे, संगीता अंभोरे, शालिनी बर्फे, सीमा भंडारी, वंदना खिल्लारेआदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमृता डोंगरदिवे, पंकज बनसोडे, अर्जुन अभंग, अशोक खिल्लारे, हनीफ पटेल, नितीन शेजवळ, संदीप आल्हाट, प्रकाश ससाने, सिद्दोधन गवंदे, मनीष शेळके, प्रदीप वाहुळ यांनी परिश्रम घेतले.

मनुस्मृति दहन दिनानिमित्त प्रत्येक वर्षी २५ ते २९ डिसेंबर दरम्यान भारतीय स्त्री मुक्ती दिन परिषदचे आयोजन करण्यात येते. या परिषदेत वेगवेगळे ठराव घेऊन ते शासनास पाठवल्या जाते. त्याचाच एक भाग म्हणून रांजणगाव येथे आलेल्या या परिषदेत २५ डिसेंबर हा स्त्री मुक्ती दिन जाहीर करावा, राजस्थानातील उच्च न्यायालयासमोर असलेला मनुस्मृतीचा पुतळा हटवावा, महिला आरक्षण कायद्यात दुरुस्ती करावी, मणिपूर येथील महिला अत्याचाराचा निषेध, जातीय जनगणना करण्यात यावी, महिलांसाठी सुरक्षित वातावरण व गाजा पट्टीतील युद्धाचा निषेध. असे एकूण आठ ठराव घेऊन ते सूचक व अनुमोदक यासह पास करण्यात आले.

या भारतीय स्त्री मुक्ती दिन परिषदेत शौकत चांद शेख, दिपाली गायकवाड यांच्यासह एम आय एम व इतर पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडी प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# तीसगावच्या उपसरपंचपदी प्रवीण हांडे यांची निवड

वाळूजमहानगर दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मराठा व धनगर समाजाच्या आरक्षणास पाठिंबा म्हणून नागेश कुठारे यांनी दिलेल्या उपसरपंच पदाच्या राजीनामा नंतर रिक्त झालेल्या तीसगाव ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदासाठी शुक्रवारी (ता.२९) रोजी घेण्यात आलेल्या निवडणुकीत प्रवीण हांडे विजयी झाले.

तिसगाव येथे उपसरपंचाची निवड करण्यासाठी शुक्रवारी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. वेळी उपसरपंच पदासाठी प्रवीण हांडे, नितीन जाधव, गणेश बिरंगळ व संजय जाधव यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले होते. संजय जाधव व गणेश बिरंगळ या दोघांनी अर्ज मागे घेतल्याने प्रवीण हांडे व नितीन जाधव हे दोन सदस्य निवडणुकीच्या रिंगणात राहिले. निवडणुकीत हांडे यांना १० तर जाधव यांना ७ मते मिळाल्याने अध्यासी अधिकारी एस. आर.



लोळगे यांनी अंडे यांना विजयी घोषित केले. त्यावेळी सहायक अध्यासी अधिकारी म्हणून ग्रामविकास अधिकारी अशोक गायकवाड, तलाठी संजय पवार यांनी काम पाहिले. मतदान प्रक्रियेत सरपंच शकुंतला कसुरे, प्रवीण हांडे, ग्रामपंचायत सदस्य नागेश कुठारे, राजेश कसुरे, गणेश बिरंगळ, विष्णू जाधव, नितीन जाधव, कृष्णा गायकवाड, संजय जाधव, अरुणा जाधव, अश्विनी जाधव, पूजा तरैय्यावाले, रेणुका सलामपुरे, गोदावरी कोल्हे, संगीता अंभोरे, रेखा सूर्यवंशी व निर्मला बुट्टे या सर्व १७ सदस्यांनी भाग घेतला. उपसरपंचपदी प्रवीण हांडे यांची निवड होताच जल्लोष करून हांडे यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी माजी जि. प. सदस्य रामचंद्र कसुरे, वडगावचे सरपंच सुनील काळे, उद्योजक हनुमान भोंडवे, पोपट हांडे, उषा हांडे, रायभान शेलार आदींसह ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते. तिसगाव ग्रामपंचायतचे तत्कालीन उपसरपंच नागेश कुठारे यांनी ३० ऑक्टोबर २०२३ रोजी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत मराठा व धनगर समाजाच्या अरक्षणास जाहीर पाठिंबा देण्यासाठी उपसरपंच पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे हे पद रिक्त झाले होते.

# केवळ बीएमआयने लठ्ठपणा ठरविला जाऊ शकत नाही-डॉ.शशांक शाह

मुंबई दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- एंडोक्रिनोलॉजिस्ट, डायबेटोलॉजिस्ट, स्त्रीरोग तज्ज्ञ आणि बॅरिएट्रिक सर्जन, कार्डिओलॉजिस्ट या तज्ज्ञांनी एकत्र येऊन अभ्यास करत जर्नल ऑफ असोसिएशन ऑफ फिजिशियन ऑफ इंडिया () मध्ये नुकताच शोधनिबंध प्रकाशित केला. या शोधनिबंधात लठ्ठपणा हा केवळ बीएमआयवर आधारित नवीन लठ्ठपणा मार्गदर्शक तत्त्वांची शिफारस करण्यात आली आहे.नवीन मार्गदर्शक तत्त्वांची २०२४ मध्ये सर्व वैद्यकीय तज्ञ आणि संघटनांनी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे मत डॉं.शशांक शाह, प्रख्यात लठ्ठपणा शल्यचिकित्सक आणि डॉं.निता देशपांडे, सह लेखक आणि मधुमेहतज्ञ यांनी व्यक्त केले. लठ्ठपणा म्हणजे शरीरात अतिरिक्त चरबी जमा होणे ज्यामुळे आपल्या आरोग्यास धोका निर्माण होतो. यासाठी करण्यात आलेल्या सर्नेक्षणात संपूर्ण भारतातील १००,५३१ प्रौढांच्या डेटाचे मूल्यमापन केले. अलीकडील देशव्यापी क्रॉस-सेक्शनल अभ्यासानुसार, देशातील लठ्ठपणाचे प्रमाण ४०.३% इतके आहे, ज्यात महिला, शहरी लोकसंख्या आणि ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. लठ्ठपणाच्या सर्वात जास्त घटना दक्षिण भारतात (४६.५१%) नोंदल्या गेल्या आहेत तर सर्वात कमी पूर्व भारतात (३२.९६%) आहेत. २० ते ६९ वर्षे वयोगटातील भारतीय प्रौढांमध्ये २०४० पर्यंत लठ्ठपणाचे प्रमाण तिप्पट होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. वाढत्या लठ्ठपणाच्या दराबरोबरच मधुमेहाचा भार देखील जास्त आहे आणि जागतिक स्तरावर वाढत आहे. याचे मुख्य कारण अस्वास्थ्यकर जीवनशैली आहे. २०१९ चा आकडेवारीनुसार भारतात ७७ दशलक्ष लोकांना मधुमेह आहे आणि २०४५ पर्यंत ही संख्या १३४ दशलक्षांपेक्षा जास्त होण्याची अपेक्षा आहे, यापैकी अंदाजे ५७% लोकांचे निदान झालेले नाही. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बॅरिएट्रिक सर्जन आणि ओबेसिटी अँड मेटाबॉलिक सर्जरी सोसायटी ऑफ इंडिया (), इंटरनॅशनल एक्सलन्स फेडरेशन , आणि ऑल इंडिया असोसिएशन फॉर ॲडव्हान्सिंग रिसर्च इन ओबेसिटी () चे माजी अध्यक्ष डॉ. शशांक शाह यांनी सांगतात की, आंतरराष्ट्रीय स्तरावर ही नवीन मार्गदर्शक तत्त्वे आधीच लागू करण्यात आली आहेत आणि लठ्ठपणावरील उपचार संबंधित समस्यांवर आधारित आहेत. भारताला मधुमेहाची राजधानी म्हणून ओळखले जाते, आणि ते जगातील सर्वाधीक तरुणांची संख्या असलेल्या राष्ट्रांपैकी एक आहे. लठ्ठपणा आणि जास्त वजन हे जगभरात महामारीचे कारण ठरत आहे आणि भारतही त्याला अपवाद नाही. ही स्थिती कर्करोग, टाइप २ मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादींसह सर्व चयापचय रोगांची जननी आहे आणि गुडघ्यांचा संधिवात, नैराश्यासारख्या मानसिक विकारांनाही कारणीभूत ठरत आहे.

बॉडी मास इंडेक्स हे लठ्ठपणा परिभाषित करण्यासाठी वापरले जाणारे सामान्य संज्ञा आहे. मार्गदर्शक तत्त्वांनुसार, भारतात, एखाद्या व्यक्तीचा बीएमआय २३-२५ /२ च्या दरम्यान असतो तेव्हा त्या व्यक्तीचे वजन जास्त आहे असे मानले जाते, तर २५ /२ पेक्षा जास्त बीएमआय असलेली व्यक्ती लठ्ठ मानली जाते. तथापि, भारतीय लोकसंख्येला कंबरेभोवती, विशेषत: यकृत आणि स्वादुपिंड यांसारख्या अंतर्गत अवयवांभोवती अतिरिक्त चरबी जमा होण्याची शक्यता असते. मधुमेहासारख्या चयापचयाशी संबंधित रोगांसाठी हे प्रारंभिक कारण ठरु शकते, ज्याला व्हिसेरल लठ्ठपणा किंवा ओटीपोटाचा लठ्ठपणा देखील म्हणतात. शारीरिक निष्क्रियता आणि वृध्दत्व यांचा भारतातील लठ्ठपणाशी संबंध आहे. स्त्रियांमध्ये ओटीपोटाचा लठ्ठपणा सामान्यत: तिशीनंतर विकसित होतो. दुर्दैवाने, ओटीपोटात लठ्ठपणा आणि चयापचय सिंड्रोम असलेल्या भारतीय लोकसंख्येला हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगाचा धोका जास्त असतो, मग त्यांचा बॉडी मास इंडेक्स काहीही असो असेही डॉ. शशांक यांनी स्पष्ट केले.

# जालन्यातील खराब रस्त्यांच्या पार्श्वभुमीवर शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या नेतृत्वात अभंग, भजन, पोवाडे गावून अनोखा आंदोलन

## नागरिकांचा आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद खड्डेच खड्डे चोहीकडे गेला रस्ता कुणीकडे...।

जालना दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- जालना शहरातील लक्कड ते गांधीचमन, स्वयंमवर मंगल कार्यालय ते मुक्तेश्वर प्रवेशव्दार, महात्मा गांधीचमन ते रेल्वे स्टेशन, चंदनझिरा, साईसिटी ते बायपास रस्ता येथील मुख्य रस्ता यांसह आदी रस्त्यांची अत्यंत दैनंनिय अवस्था झालेली असून या रस्त्यांची दुरुस्ती व्हावी या या मागणीसाठी २०२३ या वर्षात अनेक वेळा निवेदने दिले. तरीही जालना महानगर पालिकेने त्याकडे कायमच दुर्लक्ष केले. येत्या २०२४ या नवीन वर्षात तरी या रस्त्यांची सुधारणा करण्यात यावा या करिता आज ३१ डिसेंबर रोजी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या नेतृत्वाखाली व स्थानिक नागरिकांच्या वतीने मुक्तेश्वर तलावाजवळ अभंग, भजन, पोवाडे, भावगिते गाऊन पालिकेचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

या आंदोलनावेळी उपजिल्हाप्रमुख रावसाहेब राऊत, शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोठीवाले, विधानसभा संघटक दिपक रणनवरे, माजी नगरसेवक जगन्नाथ चव्हाण, विजय पवार, गंगुताई वानखेडे, संदीप झारखंडे, रविकांत जगधने, परमेश्वर शिंदे, किशोर नरवडे, राजु इंगळे, सुरेखा कुलकर्णी, मंजुषा घायाळ, उषाताई देशपांडे, कल्पना आगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या आंदोलनास भाग्यनगर व परिसरातील नागरिकांनी उत्स्पुर्तपणे सहभाग घेतला.

यावेळी शाहीर काटे यांनी महानगर पालिकेसंदर्भात अत्यंत वस्तुस्थिती मांडणारे पोवाडे, लोकगिते सादर केली. यातील नगर पालिका अंधळी झाली काय, या गिताने उपस्थित आंदोलकर्त्यांची मने जिंकली. या आंदोलनास शहरातील शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी व स्थानिक नागरिकांनी उत्स्पुर्त प्रतिसाद देत आंदोलनात भाग घेतला. या आंदोलनास अबालवृध्द नागरिक सहभागी झाले होते. नागरिकांमधून रस्त्यामुळे होणारा त्रास प्रकृषाने मांडला जात होता. अनेक महिला पोटतिडकीने तेथील समस्या मांडत होत्या. या रस्त्यांमुळे अनेकांना अपघात होवून अपंगत्व आले. तर मणका, दम्याचे विकार जडल्याचे नागरिक सांगत होते. निवेदन स्विकारण्यासाठी आलेले पालिकेच्या अधिकार्यांवर महिलांनी प्रश्नांची सरबत्ती करुन जाब विचारला.

यावेळी जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, मुक्तेश्वरव्दार ते स्वयंम मंगल कार्यालय हा अत्यंत महत्वाचा रस्ता आहे. या रस्त्यावरुन जड वाहतुक मोठ्या प्रमाणात होते. याच वाहतुकीमुळे येथील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून या त्रासाकडे महानगर पालिकेने जाणिवपूर्वक डोळेझाक केली आहे. जालना शहरातील नागरिकांशी काहीच देणेघेणे नसल्यासारखे पालिकेचे वर्तन असल्याचे अंबेकर म्हणाले. २००४ साली झालेल्या या रस्त्यावर पालिकेने एक टोपलेही टाकले नाही, याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

जालना शहरातील नुतनवसाहत, बडीसडक, कन्हैयानगर येथील रस्त्यांसाठीही आंदोलने केल्याशिवाय पालिकेने त्याकडे ढूकूनही पाहिले नव्हते. आंदोलनानंतरच पालिकेला जाग आली होती. आता खराब रस्त्यांसाठी शिवसेनेच्या वतीने त्या-त्या रस्त्यावर जावून आवाज उठविला जाईल. मागील वर्षांत काहीच झाले नाही. आता पुढील वर्षात तरी रस्ते चांगले व्हावेत, ही अपेक्षा त्यांनी अंबेकरांनी व्यक्त केली. तसेच वर्षाचा शेवटचा दिवस असल्याने थर्टीफास्टच्या निमित्ताने तरुणाई नको त्या मार्गाने हा दिवस साजरा करते परंतु या स्थानिक नागरिकांनी आपल्या रस्त्याच्या प्रश्नांवर एकत्र येवून भजन, अभंग, पोवाडे गायन करुन पालिकेचे लक्ष वेधण्याचा अनोखा प्रयत्न करुन सर्वांसाठी आदर्श घालून दिल्याचे ते म्हणाले.

निवेदनाप्रसंगी अधिकार्यांना जिल्हाप्रमुख अंबेकर यांच्यासह नागरिकांनी प्रचंड धारेवर धरत आपला रोष व्यक्त केला. या आंदोलनात डॉ. राजेश राऊत, मंगल मेटकर, प्रभाकर पवार, राजु भवने, तुकाराम भुतेकर, मिलिंद काळे, श्याम लांडगे, मनोज लंके, आर.एल. कुलट, ऋषीकेश काळे, गोपी मोहिदे, गणेश चौधरी, सागर टाकूर, युवराज कुरिल, बबन काजळे, सनी साखरे, सुभाष पिंताबरे,




संजय रत्नपारखे, दिपक गरुड, प्रल्हाद पवार, जीवन खंडागळे, दौलत नाईक, शेषराव खडके,सुभाष सदाव्रर्ते,नितीन भगत, गजानन गिराम, धोंडीराम आडगळे, विजय शेळकर, विजय केळगावकर, आनंद जमधडे, हर्षद खाकीवाले, बंडू देशमुख, विठ्ठल पाऊलबुध्दे, मदन साखरे, जहागिरदार, शिला कुलकर्णी, जयश्री कुलकर्णी, अर्चना भवने, गिता बंडे, संतोष खंडागळे, नरेश जगदने, राहुल वाघमारे, अजय वानखेडे, सचिन ससाने, अशोक कांबळे, अनिल दंडे, सुधीर कस्तुरे, बबन भुसारे, सुनिल जगताप, हरिभाऊ राऊत, दिपक भिने, साहेबराव दंडे, राजेश मोरे, दिनकर चोरमारे, शेषराव खडके, चेतन भुरेवाल, सोनाजी खांडेभराड, सागर ठाकुर, सखावत पठाण, मिलिंद काळे, संदीप मगर आदींसह शेकडो नागरिक व शिवसैनिकांची उपस्थिती होती.

# छत्रपती संभाजीनगरात पहिलीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलीवर अत्याचार; नराधम आरोपी एका मुलाचा बाप

पैठण दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एक धक्कादायक घटना समोर आली असून, पहिलीच्या वर्गात शिकणाऱ्या सहा वर्षीय मुलीवर अत्याचार केल्या प्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पैठण तालुक्यातील एका गावात ही घटना घडली आहे. सदर घटनेनंतर आरोपी फरार झाला असून, पैठण पोलीस त्याचा शोध घेत आहेत. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी याच भागात अल्पवयीन मुलीवर दोन जणांनी अत्याचार केल्याची घटना ताजी असताना ही घटना समोर आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. बाळू ज्ञानोबा जाधव असे या नराधमाचे नाव आहे.

अधिक माहितीनुसार, पहिलीच्या वर्गात शिकत असलेली अल्पवयीन मुलगी दुपारी शाळेतून घरी जात होती. यावेळी रस्त्यात या मुलीला अडवून बाळू ज्ञानोबा जाधव याने तिच्यावर अत्याचार केला. दरम्यान, मुलीने घडलेला प्रकार आईला सांगितला. त्यामुळे, पीडित मुलीच्या आईने पैठण पोलीस ठाणे गाठून या अत्याचार प्रकरणाची तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळास भेट देऊन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला. मात्र, या घटनेनंतर आरोपी फरार झाला असून, पोलिसांचा पथक त्याचा शोध घेत आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा विवाहित असून, त्याला एक मुलगा आहे. आरोपी हा पिडीत मुलीच्या घराजवळ राहत असून, गावात यापूर्वी दोन वेळा त्याने मुलीची छेड काढली होती अशीही चर्चा आहे. मात्र, गावातील प्रकरण असल्याने ग्रामस्थांच्या मध्यस्थीने हे प्रकरण मिटवले होते. परंतु, आता त्याने एका मुलीवर अत्याचार केल्याने गावात खळबळ उडाली आहे. तर, पोलिसांत गुन्हा दाखल होताच आरोपी फरार झाला आहे.

पिडीत मुलगी मंगळवारी दुपारी शाळेतून घरी जेवण्यासाठी आपल्या चुलतभावाबरोबर चालली होती. यावेळी आरोपी बाळू जाधव याने सदर मुलीला तुला पेरू देतो, असे म्हणून त्याच्या घरात नेले व दरवाजा बंद करून त्याने सदर मुलीवर अत्याचार केला. त्यानंतर तो फरार झाला. घाबरलेल्या पीडित मुलीने दोन दिवसांनंतर ही बाब आपल्या आई, वडिलांना सांगितली. त्यानंतर आरोपी बाळू ज्ञानोबा जाधव विरोधात बलात्कार व बाललैंगिक अत्याचार याकलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पैठण पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यासाठी पथक नियुक्त करण्यात आले असून, त्याचा शोध घेतला जात आहे.

## 'मम्मी-पप्पा मला माफ करा, मी साथ नाही देऊ शकलो': चिठ्ठी लिहून जामगावच्या १४ वर्षीय विद्यार्थ्याची आत्महत्या

गंगापूर दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- 'मम्मी-पप्पा मला माफ करा, मी शेवटपर्यंत तुम्हाला साथ नाही देऊ शकलो,' अशी चिठ्ठी लिहून आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने पंख्याला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना तालुक्यातील जामगाव येथे शुक्रवारी (२९ डिसेंबर) रात्री सात वाजेच्या सुमारास उघडकीस आली. ओमकार दत्तात्रय पाठे ( १४, रा. जामगाव) असे आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्याचे नाव आहे.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन ओमकार यास खाली उतरवून गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकारी साजिद शेख यांनी त्यास तपासून मृत घोषित केले. शनिवारी सकाळी उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर जामगाव येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याने गळफास घेतला त्या वेळी घरी कुणीच नव्हते.

त्याने आत्महत्या का केली, असा प्रश्न उपस्थित होत आहे. याप्रकरणी गंगापूर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक शकील शेख हे करत आहेत.

## एएफएम चॅम्पियनशिप जिंकणारा पहिला भारतीय

पुणे दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- एम. साई दीप आणि त्याच्या कावासाकी संघाने चॅम्पियनशिपमधील प्रथम क्रमांकाचे लक्ष्य राखून अपवादात्मक कामगिरी केली. त्याच्या उल्लेखनीय कामगिरीमध्ये अनेक विक्रमी सर्वोत्कृष्ट लॅप वेळा सेट करणे आणि २०२३ हंगामात असंख्य शर्यतींमध्ये विजय मिळवणे, शेवटी २०२३ हंगामासाठी विजेतेपद मिळवणे यांचा समावेश आहे. त्याने फॉर्म्युला ४० लाइटवेट नवशिक्या इव्हेंट दरम्यान बटणविलो रेसवे पार्क आणि थंडर हिल रेसवे येथे अनेक जलद लॅप टाईम रेकॉर्ड आणि एकाधिक विजय मिळवले आणि विजेतेपद जिंकण्यासाठी एकूण १७६ गुण मिळवले. एकमेव भारतीय खेळाडू म्हणून अभिमानाने उभे राहून, त्याने अंतिम शर्यतीपर्यंत संपूर्ण स्पर्धेत कठीण स्पर्धेवर मात केल्याच्या समाधानावर भर दिला.

एम. साई दीपला कॅलिफोर्नियामधील पोर्श क्लबसोबत सुपरकार्स रेसिंग करण्याचा आणि यूएसए मधीलएएफएम, वेराआणि सीआरए सिरीजसह सुपरबाइकमध्ये व्यावसायिक स्पर्धा करण्याचा महत्त्वपूर्ण अनुभव आहे. एमएस धोनी, अरुण पांडे, नागार्जुन, नंदिश, अमित आणि सत्या यांसारख्या उल्लेखनीय व्यक्तींसोबत त्यांनी माही रेसिंग टीम इंडियाचे संस्थापक आणि सह-मालक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. संघ व्यवस्थापनाचा अविभाज्य भाग म्हणून, माही रेसिंग संघाने २०१३ मध्ये जागतिक अजिंक्यपद जिंकून एक ऐतिहासिक टप्पा गाठला, ज्यामुळे खेळाच्या इतिहासात अशी कामगिरी करणारा पहिला भारतीय संघ बनला.

२०१० मध्ये, तो मोटोजीपी सपोर्ट शर्यतीसाठी पात्र ठरणारा पहिला भारतीय ठरला. त्यानंतर त्याने मोटोजीपी, मोटोअमेरिका आणि वर्ल्ड एसबीके संघांसोबत सहकार्य केले आहे, फॉर्म्युला १, नेस्कर, इंडीकार सीरीज़, मलेशियाई जीपी सुपरकार सीरीज़, मोटोजीपी, एशियन जीपी, एएमए रेसिंग आणि वर्ल्ड सुपरबाइक यांसारख्या विविध जागतिक रेसिंग इव्हेंटमध्ये सहभागी होऊन, त्याच्या समृद्ध आंतरराष्ट्रीय रेसिंगचे प्रदर्शन केले आहे.

## पशूंची उत्पादन क्षमता आणि पुनरुत्पादन आरोग्य सुधारण्यात सहायक ठरते

मुंबई दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भारतातील सर्वात मोठ्या वैविध्यपूर्ण कृषी उद्योगांपैकी एक, गोदरेज ॲग्रोवेट लिमिटेडने गोदरेज दौलत आणि गोदरेज धनलक्ष्मीही दोन पशु आहार उत्पादने बाजारपेठेत दाखल केली आहेत.

आधुनिक संशोधन व विकासातून तयार केलेली, विविध फील्डट्रायल्स नंतर सादर करण्यात आलेल्या नवीन कंपाउंड फीड सोल्युशन्समुळे पशूंची उत्पादन क्षमता व पुनरुत्पादक आरोग्य सुधारण्यात मदत करणारी उत्पादने सादर करण्याच्या कंपनीच्या प्रयत्नांना चालना मिळेल आणि शेतकऱ्यांचा नफा देखील वाढेल.

नवीन उत्पादने लॉन्च करण्यात आल्या बद्दल, गोदरेज ॲग्रोवेट लिमिटेडचे ॲनिमल फीड बिझनेसचे सीईओ श्री. संदीप सिंग यांनी सांगितले, ''कंपाउंड फीड हे केवळ खाद्य नाही तर भविष्यासाठी गुंतवणूक आहे. पशूंचे आरोग्य चांगले राहावे, दूध उत्पादनामध्ये जास्तीत जास्त वाढ व्हावी आणि शेतकऱ्यांना लाभदायक दुग्ध शेतीकरता यावी यासाठी गोदरेज दौलत व गोदरेज धनलक्ष्मी सादर करून आम्ही शेतकऱ्यांना असा उपाय उपलब्ध करवून देऊ इच्छितो ज्यामुळे पशूंना सर्वात कमी खाद्य देऊनदे खील सर्वात जास्त दुग्ध उत्पादन मिळवता येऊ शकेल.''

त्यांनी पुढे सांगितले, ''योग्य कंपाउंड फीड निवडून शेतकरी महत्वपूर्ण गुंतवणूक करत आहेत, जी पुढे दीर्घकाळापर्यंत त्यांना उपयोगी ठरणार आहे. आमच्या कंपाउंडफीड सोल्युशन्सच्या मदतीने शेतकऱ्यांना पारंपरिक खाद्य प्रकारांच्या ऐवजी हे प्रगत खाद्य निवडून अतुलनीय यश मिळवता येईल.''

गोदरेज दौलत आणि गोदरेज धनलक्ष्मीमध्ये सर्व आवश्यक खनिजे आणि जीवन सत्त्वे असल्यामुळे संतुलित पोषण पुरवले जाते जे पशूंना दिल्या जाणाऱ्या इतर खाद्यांमधून मिळत नाही. पशूंचे एकंदरीत आरोग्य आणि पुनरुत्पादक क्षमता सुधारण्यासाठी एक लिटर दुधासाठी गायींना ३०० ग्रॅम आणि म्हैशींना ५००ग्रॅम गोदरेज दौलत द्यावे असे सुचवण्यात आले आहे. गोदरेज धनलक्ष्मीच्या बाबतीत डोसचे प्रमाण एक लिटर दुधासाठी गायींना ४००ग्रॅम आणि म्हैशींना ५००ग्रॅम इतके असले पाहिजे.

गोदरेज दौलत आणि गोदरेज धनलक्ष्मी हे दोन्ही पाण्यात न भिजवता देता येतात. पण शेतकऱ्यांनी आधीच्या पशु खाद्याचे प्रमाण आठवडा भरात हळूहळू कमी करून त्याऐवजी निवडलेल्या उत्पादन द्यावे. जर शेतकरी गोदरेज धनलक्ष्मी वापरत असतील तर त्यांना आपल्या पशूंना दिवसातून दोनदा हिरवा आणि सुका चारा द्यावा लागेल आणि प्रभावी उत्पादनासाठी पिण्याचे पाणी चोवीस तास उपलब्ध करून द्यावे लागेल.

दूध उत्पादनाचा ७०% खर्च हा पशु खाद्यावर अवलंबून असतो, त्यामुळे पशूंच्या अनुवांशिक व पुनरुत्पादक क्षमतेमध्ये वाढ करण्यास मदत करणारे खाद्य वापरले गेले पाहिजे. यासाठीच गोदरेज एनिमल फीड पशूंच्या पोषणाची नवी व्याख्या रचत आहे आणि पशूंना खाद्याचे प्रत्येक ग्रामच्या ऐवजी अधिक पोषण प्रदान करून शेतकऱ्यांचे कल्याण करत आहे.

# राजकुमार हिरानी यांच्या निदर्शनास आल्यानंतर रोहिताश्व गौड यांनी चित्रपट डंकीमध्ये भूमिका साकारली

मुंबई दि.१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय मालिका भाबीजी घर पर हैमधील आयकॉनिक भूमिका मनमोहन तिवारीसाठी प्रसिद्ध रोहिताश्व गौड यांनी टेलिव्हिजन व बॉलिवुड क्षेत्रात स्वत:चे नावलौकिक केले आहे. त्यांच्या अपवादात्मक विनोदीशैलीने त्यांना मनोरंजन क्षेत्रातील प्रतिभावान कलाकार म्हणून त्यांचे स्थान प्रबळ केले आहे. नुकतेच, गौड यांनी राजकुमार हिरानी यांचा चित्रपट डंकीमध्ये फसवणूक करणाऱ्या व्हिसा एजंटची भूमिका साकारली. गप्पागोष्टी करताना त्यांनी ही भूमिका कशाप्रकारे मिळाली याबाबत सांगितले.

शाहरूख खान अभिनीत चित्रपटामध्ये काम करण्याबाबत रोहिताश्व गौड म्हणाले, यावर विश्वास बसत नाही आहे, पण आश्चर्यकारकपणे मला ही मोठी संधी मिळाली. रोचक बाब म्हणजे हे सर्व एका दिवसात घडले. मी नायगावमध्ये माझी मालिका भाबीजी घर पर हैसाठी शूटिंग करत होतो. व्यस्त प्रवासामुळे मी सेटजवळ एका सदनिकेमध्ये राहतो आणि सुट्टी मिळाली की गोरेगाव येथील माझ्या घरी जातो. आम्हाला दुसऱ्या दिवशी शूटिंग करायची होती, पण अनपेक्षिपणे मला सकाळी बातमी मिळाली की आम्हाला कामावर एक आठवडा सुट्टी मिळाली आहे. मी या ब्रेकचा उपयोग करत माझ्या कुटुंबासोबत वेळ व्यतित करण्यासाठी घरी जाण्याचे ठरवले. घरी जात असताना मला राजकुमार हिरानी जी यांचा कॉल आला, त्यांनी मला माझ्या ठावठिकाणाबाबत विचारले. मी त्यांना सांगितले की मी माझ्या घरी जात आहे. त्यांनी मला अधिक काही न सांगता गोरेगावमधील फिल्मसिटीला येण्यास सांगितले. तेथे पोहोचल्यानंतर मी सेटवरील हजारो व्यक्तींची गर्दी पाहून भारावून गेलो. त्यानंतर श्री. हिरानी यांनी मला सांगितले की ते पंजाबमधील सुप्रसिद्ध थिएटर कलाकारासोबत एका सीनचे चित्रीकरण करत होते, जो त्या चित्रपटामध्ये ती भूमिका साकारणार होता. पण काही कारणास्तव तो तेथे येऊ शकला नाही. चित्रपटाच्या शूटिंगचा तो पहिलाच दिवस होता आणि श्री. हिरानी यांनी काहीही करून चित्रीकरण न थांबवण्याचा निर्धार केला होता. तो चित्रपटाच्या शूटिंगचा पहिलाच दिवस होता आणि राजकुमार हिरानी जींना कोणतेही व्यत्यय नको होते, ज्यामुळे त्यांनी त्वरित माझा विचार केला. मी यापूर्वी देखील त्यांच्यासोबत काम केले आहे. सरांनी मला त्यांचा चित्रपट डंकीमधील फसवणूक करणारा पंजाबी व्हिसा एजंट लालटूची भूमिका ऑफर केली. मी मनापासून ही प्रभावी भूमिका स्वीकारली. त्यांनी मला भूमिका व सीनबाबत सविस्तरपणे सांगितले, ज्यामुळे मला पंजाबी भाषाशैलीवर काम करता आले. शूटिंगनंतर राजकुमार जींनी माझ्या घरी मोठा पुष्पगुच्छ पाठवला आणि माझे आभार व्यक्त केले. ते अत्यंत छान गेस्चर होते.

राजकुमार हिरानी यांच्यासोबतच्या त्यांच्या चांगल्या संबंधाबाबत सांगताना अभिनेते म्हणाले, मी १९९७ मध्ये डीडी चॅनेलवरील त्यांच्या एका शोसाठी ऑडिशनकरिता मुंबईमध्ये आलो होतो, तेव्हा त्यांना पहिल्यांदा भेटलो. दुर्दैवाने, तो शो पडद्यावर कधीच आला नाही. पण, राजकुमार यांनी मला त्यांच्या भावी प्रोजेक्ट्समध्ये संधी देण्याचे वचन दिले आणि चित्रपट डंकीमधील भूमिका त्यापैकीच एक संधी आहे. मी हिरानी जी यांच्यासोबत त्यांची प्रसिद्ध ॲन्थोलॉजी सिरीज द बेस्टसेलर्समध्ये काम केले आहे, जेथे मी प्रमुख भूमिका साकारली. आमच्यामध्ये नाते अत्यंत छान आहे. डंकीसाठी शूटिंग करण्याचा अनुभव आनंददायी होता. हिरानी जी यांनी चित्रपटाचे लेखक अभिजत जोशी आणि तापसी पन्नू यांच्याशी माझी ओळख करून दिली. तापसीने मला मालिका भाबीजी घर पर हैमधील माझ्या भूमिकेसाठी ओळखले, जे आनंददायी सरप्राइज होते. तापसी देखील या मालिकेची चाहती आहे. मला अशा मोठ्या चित्रपटामध्ये भूमिका साकारण्याची संधी मिळेल असा मी कधीच विचार केला नव्हता, पण सर्वकाही आपसूक घडले



(हसतात). तो माझ्यासाठी अद्भुत योगायोग व उत्साहवर्धक अनुभव होता.

पहा रोहिताश्व गौड यांना मनमोहन तिवारीच्या भूमिकेत मालिका भाबीजी घर पर हैमध्ये दर सोमवार ते शुक्रवार रात्री १०.३० वाजता फक्त एण्ड टीव्हीवर!

# टोमॅटो लागवड



महाराष्ट्रात टोमॅटो लागवडी खा अंदाजे २९१९० हेक्टर क्षेत्र आहे. नाशिक, पुणे, सातारा, अहमदनगर, नागपूर, सांगली हेक्टरी महाराष्ट्रातील टोमॅटो पिकवणारे महत्वाचे जिल्हे आहेत. तीनही म्हणजे खरीप, रब्बी उन्हाळी या तीनही हंगामात टोमॅटो पिकाची लागवड करता येत असल्यामुळे टोमॅटो हे महाराष्ट्रातील शेतक-यांचे प्रमुख फळपिक आहे. टोमॅटो मध्ये शीर संरक्षक अन्नघटक मोठया प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे टोमॅटोचे आहारातील महत्व अनन्य साधारण आहे. टोमॅटो अ, ब आणि क जीवनसत्वे तसेच खनिजे चुना, लोह इत्यादी पोषक अन्नद्रव्येही टोमॅटो मध्ये पुरेशा प्रमाणात असतात.

टोमॅटोची कच्ची अथवा लाल रसरशीत फळे भाजी किंवा कोशिंबीरीसाठी वापरली जातात. तसेच टोमॅटोच्या पिकलेल्या फळांपासून सुप, लोणचे, सॉस, केचप, जाम, ज्युस इत्यादी पदार्थ बनविता येतात. यामुळे टोमॅटोचे औद्योगिक महत्व वाढलेले आहे.

**हवामान**

टोमॅटो हे उष्ण हवामानातील पिक असले तरीही महाराष्ट्रात टोमॅटोची लागवड वर्षभर केली जाते. अति थंडी पडल्यास टोमॅटोच्या झाडाची वाढ खुंटते. तपमानातील चढउताराचा फळधारणेवर अनिष्ट परिणाम होतो. १३ ते ३८ सेल्सियस या तापमानास झाडाची वाढ चांगली होती. फूले आणि फळे चांगली लागतात. रात्रीचे तापमान १८ ते २० सेल्सियस दरम्यान राहिल्यास टोमॅटो ची फळधारणा चांगली होते. फळांना आकर्षक रंग आणणारे लायकोपिन हेक्टरी रंगद्रव्य २६ ते ३२ सेंटिग्रेडला तापमान असताना भरपूर प्रमाणात तयार होते. तापमान, सुर्यप्रकाश आणि आद्रता यांचा एकत्रित परिणाम पिकाच्या वाढीवर होतो. २० ते ३२ अंश सेल्सिअस तापमान, ११ ते १२ तास स्वच्छ सुर्यप्रकाश आणि ६० ते ७५ टक्के आर्द्रता असेल त्यावेळी टोमॅटो पिकाचे चांगले उत्पादन मिळते.

**जमीन**

टोमॅटो पिकासाठी मध्यम ते भारी जमिन लागवडी योग्य असते. हलक्या जमिनीत फळे लवकर तयार होतात, पाण्याचा निचरा चांगला होतो. आणि पिकांची वाढ चांगली होते. परंतु अशा जमिनीत सेंद्रीय खतांचा भरपूर पवुरवठा करावा लागतो आणि वारंवार पाणी देण्याची सोय असावी लागते. जमिनीचा सामू मध्यम प्रतिचा म्हणजे ६ ते ८ असावा.

**पूर्वमशागत**

शेतास उभी आडवी नांगरणी देऊन नंतर ढेकळे फोडून वखारणी द्यावी. जमिनीत हेक्टरी ३० ते ४० गाडया शेणखत मिसळावे लागवडीसाठी २ ओळीतील अंतर ६० ते ९० सेमी व दोन रोपातील अंतर ४५ ते ६० सेमी ठेवावे. खरीप व हिवाळी हंगामासाठी ९० बाय ६० सेमी अंतरावर व उन्हाळी हंगामासाठी ६० बाय ४५ सेमी अंतरावर लागवड करावी.

**हंगाम**

खरीप जून, जूलै महिन्यात बी पेरावे.

रब्बी ( हिवाळी हंगाम) सप्टेबर, ऑक्टोबर मध्ये महिन्यात बी पेरावे.

उन्हाळी हंगाम डिसेंबर, जानेवारी महिन्यात बी पेरावे

बियाण्याचे प्रमाण हेक्टरी टोमॅटो पिकाचे ४०० ते ५०० ग्रॅम बी लागते.

**सुधारीत वाण**

महाराष्ट्रात लागवडीच्या दृष्टीने उपयुक्त टोमॅटोचे वाण खालीलप्रमाणे आहे.

पुसा रूबी : तीनही हंगामात घेता येते. लागवडीनंतर ४५ ते ९० दिवसांनी फळे काढणीस येतात. फळे मयम चपटया आकाराची गर्द लाल रंगाची असतात. हेक्टरी उत्पादन ३२५ क्विंटल

पुसा गौरव : ही जात झुडूप वजा वाढणारी आहे. फळे लांबट गोल पिकल्यावर पिवळसर लाल रंगाची होतात. वाहतूकीस योग्य आहे. हेक्टरी उत्पादन ४०० क्विंटल

पुसा शितल : हिवाळी हंगामासाठी लागवडीस योग्य जात असून फळे चपटी गोल लाल रंगाची असतात. हेक्टरी उत्पादन ३५० क्विंटल

अर्का गौरव : फळ गडद लाल मांसल व टिकावू असतात. हेक्टरी उत्पादन ३५० क्विंटल पर्यंत

रोमा : झाडे लहान व झुडपाळ असून फळे आकाराने लांबट व जाड साल असल्याने वाहतूकीस योग्य आहे. हेक्टरी उत्पादन २५ टन.

रूपाली, वैशाली, भाग्यश्री, अर्का विकास, पुसा अर्ली डवार्फ इ. जातीची लागवड केली जाते.

**लागवड**

रोपे तयार करण्यासाठी बियांची पेरणी गादी वाफयावर करावी. गादी वाफा तयार करण्यापूर्वी जमिनीची खोल नांगरट करून कुळवाच्या २, ३ पाळया देऊन जमिन भुसभूशीत करावी. गादी वाफा हा १ मी. रूंद ३ मी लांब व १५ सेमी उंच असावा. गादी वाफयात १ घमेले शेणखत ५० ग्रॅम सुफला मिसळावे व वाफा हाताने सपाट करावा. पेरणीपूर्वी बियाण्यास ३ ग्रॅम थायरम बुरशीनाशक औषध चोळावे. बियांची पेरणी ही वाफयाच्या रूंदीस समांतर बोटांनी रेघा ओढून त्यात पातळ पेरणी करून बी मातीने झाकून टाकावे. वाफयास झारीने पाणी द्यावे. बी उगवून आल्यानंतर १० ते १२ दिवसांनी दोन ओळीत काकरी पाडून प्रति वाफयास १० ग्रॅम फोरेट द्यावे. वाफे हे तणविरहीत ठेवावेत. फूलकिडे व करपा रोगाच्या नियंत्रणाकरिता १० लिटर पाण्यात १२ ते १५ मिली मोनोक्रोटोकॉस व २५ ग्रॅम डायथेन एम ४५ मिसळून बी उगवल्यानंतर १५ दिवसांनी फवारावे. नंतरच्या दोन फवारण्या १० दिवसाच्या अंतराने कराव्यात. बी पेरणीं पासून २५ ते ३० दिवसांनी म्हणजे साधारणतः रोपे १२ ते १५ सेमी उंचीची झाल्यावर रोपांची सरी वरंब्यावर पुर्नलागवड करावी. रोपे उपटण्यापूर्वी एक दिवस आधी वाफयांना पाणी द्यावे. त्यामुळे रोपांची मुळे न तुटता रोपे सहज उपलब्ध होतात. रोपांची पुर्नलागवड नेहमी संध्याकाळी किंवा उन कमी झाल्यावर करावी.

**रासायनिक खते**

सरळ वाणांसाठी २००-१००-१०० व संकरीत वाणांसाठी ३००-१५०-१५० किलो नत्र, स्फूरद पालाश या प्रमाणात खत द्यावे. अर्धा नत्र लागवडीच्या वेळी व उरलेला लागवडीनंतर ४० दिवसांनी द्यावे.

**पाणी व्यवस्थापन**

रोपांच्या लागवडीनंतर ३ ते ४ दिवसांनी हलके पाणी द्यावे. आणि त्यानंतर ८ ते १० दिवसांनी दुसरे पाणी द्यावे. जमिनीच्या मगदुराप्रमाणे पावसाळयात टोमॅटो पिकास ८ ते १० दिवसांच्या अंतराने तर हिवाळी हंगामात ५ ते ७ दिवसांच्या अंतरानी व उन्हाळी हंगामात ३ ते ४ दिवसांच्या अंतरानी रोपांना पाणी द्यावे. भारी काळया जमिनीत नेहमी हलके पाणी द्यावे. पिक फूलावर असताना व फळांची वाढ होत असताना नियमित पाणीपुरवठा होणे महत्वाचे आहे. अन्यथा फूलगळ, फळे तडकणे, या सारख्या नुसकानी संभवतात. उन्हाळयात टोमॅटो पिकाला पारंपारिक पध्दतीने पाणी दिल्यास ७७ हेक्टर सेमी पाणी लागते. तर ठिबक सिंचनाने पाणी दिल्यास ५६ हेक्टर सेमी पाणी लागते. ठिबक सिंचनामुळे पाण्याची ५० ते ५५ टक्के बचत होऊन उत्पन्नात ४० टक्के वाढ होते.

**आंतरमशागत**

नियमित खुरपणी करून तण काढून टाकावेत. खुरपणी करताना मुळांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. जेणेकरून त्याचा उत्पन्नावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

बागेला वळण आणि आधार देणे

टोमॅटो पिकाचे खोड व फांद्या कमकुवत असतात त्यामुळे त्यांना आधाराची आवश्यकता असते. आधार दिल्यामुळे झाडांची आणि फांद्यांची वाढ चांगली होते. फळे भरपूर लागतात. फळे, पाने आणि फांद्या यांचा जमिनीशी व पाण्याशी संपर्क येत नाही. त्यामुळे फळे सडण्याचे आणि रोगाचे प्रमाण कमी होते. खते देणे, फवारणी करणे, फळांची तोडणी करणे इ. कामे सुलभतेने करता येतात. टोमॅटोच्या झाडांना दोन प्रकारे आधार देता येतो. १. प्रत्येक झाडाजवळ दिड ते दोन मीटर लांबीची व अडिच सेमी जाडीची काठी रोवून झाडाच्या वाढीप्रमाणे काठीला बांधत जावे. २. या प्रकारात तारा आणि बांबू किंवा काठयांचा वापर करून ताटी केली जाते. आणि आा ताटयांच्या आधारे झाडे वढविली जातात. सरीच्या बाजूने प्रत्येक १० फूट अंतरावर पहारीने दर घेऊन त्यात दिड ते दोन मीटर उंचीच्या आणि अडिच सेमी जाडीच्या काठया घटट बसवाव्यात सरीच्या दोन्ही टोकांना जाड लाकडी दाम बांधाच्या दिशेने तिरपे रोवावेत. प्रत्येक डांबाच्या समोर जमिनित जाड खुंटी रोवून डाम खुंटीशी तारेच्या साहारूयाने ओढून बांधावेत. त्यानंतर १६ गेज ची तार जमिनीपासून ४५ सेमी वर एका टोकाकडून बांधत जाऊन प्रत्येक काठीला वेढा आणि ताण देऊन दुस-या टोकापर्यंत ओढून घ्यावे अशा प्रकारे दुसरी ९० सेमी वर व तिसरी १२० सेमी अंतरावर बांधावी. या तारेंना रोपांच्या वाढणा-या फांद्या सुतळी किंवा नॉयलॉनच्या दोरीने बांधाव्यात. टोमॅटोचे खोंड मजबूत करण्यासाठी झाडाला वळण देणे आवश्करतात.क असते.

**रोग व किड**

**रोग**

करपा : हा रोग झाडाच्या वाढीच्या कोणत्याही अवस्थेत येऊ शकतो. रोगामध्ये पाने देठ खोड यावर तपकिरी गुलाबी ठिपके पडतात.

उपाय : डायथेम एम ४५, १० लिटर पाण्यात २५ ते ३० ग्रॅम या प्रमाणात मिसळून फवारावे. फवारणी दर १० ते १५ दिवसांच्या अंतराने करावी.

भुरी : पानाच्या खालच्या बाजूस पांढरे चटटे पडतात. आणि पानाचा ***

# गुलाब लागवड



[illegible]प्रमाणे जागतिक बाजारपेठेत गुलाबाचा प्रथम क्रमांक लागतो. दरवर्षी गुलाबाचे उत्पादन वाढतच आहे. विकसनशील देशात गुलाबाची लागवड मोठ्या प्रमाणात होत आहे. पूर्व आफ्रिकेच्या अनुकूल हवामानामुळे तेथे अत्युच्च प्रतीच्या गुलाबाची निर्मिती होते. भारतात या पिकाखाली ३००० एकर क्षेत्र आहे. युरोपात या फुलास प्रचंड मागणी आहे. जवळ जवळ ८० टक्के फुले युरोपात विकली जातात. त्या खालोखाल १५ टक्के फुलास तर अवघी ५ टक्के फुले आशिया व ऑस्ट्रेलियात विकली जातात. सध्या जपानमध्ये फुलांना मागणी वाढत आहे.

जागतिक बाजारपेठेत हायब्रीड टी (लांब दांडा व मोठी फुले) प्रकाशबरोबरच फ्लोरीबंडा (आखुड दांडा व लहान फुले) प्रकारच्या फुलांना मोठी मागणी आहे. हरितगृहात लांब दांड्याच्या (५०-१२० सें. मी. ) मोठ्या फुलांचे १३५-१५० फुले चौ. मी. एवढे उत्पन्न मिळते तर आखूड दांड्याच्या (३०-७०) सें. मी. छोट्या फुलांचे २००-३५० फुले/ चौ. मी. एवढे उत्पन्न मिळते.

**हवामान** – गुलाबाच्या लागवडीकरिता कमीत कमी १५ अंश से. तर जास्तीत जास्त २८ डिग्री से. तापमानाची आवश्यकता असते. रात्रीचे तापमान १५-१८ डिग्री से. च्या दरम्यान असावे. तापमान वाढत गेल्यास अधिक उत्पादन मिळते पण फुलांची प्रतवारी बिघडते. पाकळ्यांची संख्या कमी होते. फुले लवकर उमलतात व फुलांचे काढणीत्तोर आयुष्य कमी होते.

गुलाबामध्ये सूर्य प्रकाशापेक्षा तापमान जास्त ठरते. काही जातींना जास्त तापमान लागते तर काहींना कमी, काही जाती कमी तापमानात ब्लाईड शूटस (फुले न येण्याचा प्रकार) अजिबात निर्माण करत नाही. कमी तापमानाबरोबर कमी आर्द्रता व पाण्याचा ताण सहन करू शकतात.

**ठिकाण व जागेची निवड** – हरितगृहातील गुलाबाच्या लागवडीसाठी जागेची निवड करणे फारच महत्वाचे ठरते. बँगलोर सारखे वर्षभर सम हवामान असणारे ठिकाण निवडल्यास हरितगृहातील तापमान नियंत्रण करण्याचा खर्च वाचू शकतो. जागेची निवड करताना आजूबाजूस मोठया इमारती व झाडे नसावीत. जेणेकरून, हरित गृहावर सावली पडणार नाही.

बऱ्याचदा आंतरराष्ट्रीय विमानतळ आपल्या लागवडीच्या ठिकाणापासून दूर असतो. अशा वेळेस दूरवर वाहतूक करावी लागते. वाहतुकीच्या काळात काढणीत्तोर तंत्राचा सुयोग्य वापर केल्यास इच्छित स्थळी फुले अगदी व्यवस्थित पाठविता येतात.

**जमीन** – गुलाबाची मुले जमिनीत खोलवर जात असल्याने जमीन भुसभुशीत व कमीत कमी ५० सें. मी. खोल असावी. निवडलेल्या जमिनीतून पाण्याचा योग्य निचरा व्हावा. मध्यम प्रतीच्या जमिनीत गुलाब चांगला येतो कारण अशा जमिनीतून अन्नद्रव्यांचा योग्य प्रकारे पुरवठा होतो. हलक्या जमिनीत योग्य प्रमाणात अन्नद्रव्ये घातल्यास गुलाब चांगल्या प्रकारे वाढवता येतो तसेच अशा जमिनीत सामू यापेक्षा जास्त असल्यामुळे डोलोमाईट वापरून तो योग्य त्या प्रमाणावर आणता येतो. १.७५ कि. ग्रॅ. डोलोमाईट प्रति घन मीटर वापरल्यास जमिनीची सामू ०.३-०.५ युनिटने वाढू शकतो. जमिनीचा सामू ७.० वरून ५.० आणण्यासाठी सल्फर १.५ कि. ग्रॅ. किंवा ॲल्युमिनिअम सल्फेट ३.९ कि. ग्रॅ. चा वापर करावा. जमिनीत क्लोरीन व सोडियमचे प्रमाण १.५ मि./लि पेक्षा कमी असावे.

**जमिनीची मशागत** – जमिनीच्या वरच्या (३० से.मी.) व खालच्या (३१-६० से.मी.) थरांचे रासायनिक पृथक्करण करून घ्यावे म्हणजे जमिनीतील क्षारांचे प्रमाण व अन्न द्रव्यांची उपलब्धता लक्षात येईल. त्यानंतर जमिनीचा सामू जर जास्त असेल तर तो योग्य प्रमाणावर आणावा. हलक्या जमिनीत शेणखत, पीट मिसळून त्या जमिनीचा कस वाढवावा, असे करण्याने, अशा जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. तर भारी जमिनीतून पाण्याचा निचरा होतो. कोंबडी खत हॉर्न मिलचा वापर टाळावा. लागवडीपूर्वी जमिनीचे निर्जंतूकीकरण करून घ्यावे. त्यासाठी फॉर्मलीन ०.२ टक्के प्रमाणात वापरावे.

**वाफे तयार करणे व लागवडीची पध्दत** – जमिनीच्या प्रकारानुसार वाफ्यांचा प्रकार बदलतो. जर जमिनीतून पाण्याचा योग्य निचरा होत असेल तर सपाट वाफे तयार करून त्यावर दोन रोपात २५ से.मी. तर दोन ओळीत ८० से.मी. अंतर ठेवून लागवड करावी. जर जमिनीतून पाण्याचा योग्य निचरा होत नसेल तर गादी वाफे तयार करावेत. दोन गादी वाफ्यांमध्ये ४० से.मी. खोल व ८ से.मी. रुंद वर काढावा म्हणजे पाण्याचा योग्य निचरा होईल.

सर्वसाधारणपणे ६-७ झाडे प्रति चौ. मी. लावावीत. वाफ्याची रुंदी १ मीटर दर दोन वाफ्यात ६० से.मी. अंतर ठेवावे. वाफ्याची लांबी २५ ते ४० मीटर पर्यंत ठेवावे.

**लागवडीसाठी रोपे** – कॅह्लगल्या प्रतीची रोपे लागवडीसाठी वापरावीत. गुलाबाची कलमे तयार करण्यसाठी रोझा इंडिका ओडांराटा, रोझा मल्टीफ लोरा, एडवर्ड रोसेझ, थॉर्नलेस बँगलोर जातीचे खुंट वापरतात. त्यापैकी रोझा इंडिका ओडांराटा ही जात खुंट म्हणून चांगली आहे. गुलाब लागवडीसाठी पॉलिबॅग पध्दत वापरून रोपे तयार करतात. सदर रोपांवर पाहिजे त्या जातींचे डोळे भरून अथवा कलम करून ती रोपे तयार करतात. सदर रोपांवर पाहिजे त्या जातीचे डोळे भरून अथवा कलम करून ती रोपे लागवडीसाठी वापरतात.

**लागवडीची पद्धत** – गुलाबाची रोपे महागडी असल्यामुळे व ती एकाच जागी ५-६ वर्षे राहणार असल्यामुळे सुरुवातीस लागवड करताना काळजी घ्यावी. लागवडीपूर्वी २४ तास अगोदर रोपांना पाणी दयावे. जमिनीत रोपांसाठी खडडा घ्यावा व त्यात रोपे लावावित. रोपांची मुले दुमडु नयेत. डोळे भरलेला भाग जमिनीवर २-३ से.मी. राहील याची काळजी घ्यावी. जास्त खोलवर लावलेल्या रोपांना मूळ कुजव्या रोग होतो व रोपांची वाढ व्यवस्थित होत नाही. रोपांना दररोज व्यवस्थित पाणी दयावे. प्रतिबंधक उपाय म्हणून बुरशीनाशकांच्या एक दोन फवारण्या कराव्यात. झाडांना वळण देणे वाढणाऱ्या झाडाला जर लगेच फुले येऊ दिली तर झाडाच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. झाडाचा आकार नीट राहत नाही. झाडांच्या वाढीच्या काळात वाटाण्याच्या आकाराच्या कळ्या झाल्यावर त्या काढून टाकाव्यात, झाडांची वाढ व्यवथित झाल्यावर मग मोठ्या फांद्या जमिनीपासून २०-३० सें. मी. अंतरावर छाटाव्यात मग त्यावर फुले घेण्यास सुरुवात करावी. फांद्या छाटण्याएवजी यू आकारात जमिनीलगत वाकविल्या तरी चालतात. त्यामुळे झाडाला जास्तीचा अन्नपुरवठा मिळतो व फुलेही जास्त मिळतात.

**खते** – जवळजवळ भारतातील सर्वच जमिनीत अन्नद्रव्यांची कमतरता आहे. अधिक उत्पादन मिळविण्यासाठी खतांची आवश्यकता भासते. लागवडीपूर्वी व लागवडीनंतर माती परीक्षण खताच्या मात्रा द्याव्यात. लागवडीच्या वेळेस २ किलो सुपर फॉस्फेट १ किलो कॅल्शियम अमोनियम नायट्रेट आणि ५०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश प्रति चौ. मी. द्यावे. तसेच शेणखत, पीत व भूसाही जमिनीत मिसळून द्यावा. एकाच वेळेस खते देण्याएवजी वेगवेगळ्या हफ्त्यात ती विभागून द्यावीत. हरितगृहात द्रवरूप खते पाण्यात मिसळून दिली जातात. प्रत्येकी २०० पीपीएम नत्र व पालाश पाण्यातून रोपांना दिले जाते. त्यासाठी ८५ ग्रॅम पोटँशिअम नायट्रेट व ८० ग्रॅम अमोनियम नायट्रेट प्रथम प्रति लिटर पाण्यात घेऊन ते नंतर २०० लिटर पाण्यात मिसळून झाडांना दिले जाते.

**पाणी देणे** – हरितगृहातील गुलाबाला ठिबक संचातून पाणी दिले जाते. त्यामुळे रोपांना हवे तेवढेच पाणी देता येते. लागणारे पाणी हे तापमान, आर्द्रता व सूर्यप्रकाश यावर अवलंबून असते.

**फुलांची काळजी** – फुलांची काढणी शक्यतो सकाळच्या वेळी थंड वातावरणात करावी म्हणजे फुले जास्त काळ फिल्ड हिट कमी करण्यासाठी शीतगृहात ठेवावी लागत नाहीत तो खर्च वाचतो. फुलांची काढणी धारदार कात्रीने करावी. झाडावर १ ते २ पूर्ण वाढ झालेली (पाच पाने असणारी) पाने ठेवावीत म्हणजे नंतर येणारी फुलेही चांगल्या व लांब दांड्याची राहतील, जर पूर्ण वाढ झालेली पाने झाडावर ठेवली नाही तर मात्र फुलदांड्याची लांबी कमी राहते.

**फुलाची काढणीत्तोर काळजी** – फुले काढल्यानंतर पांढरा मिनिटांत ग्रेडिंग हॉलमध्ये न्यावीत. प्रीझरवेटीव्ह म्हणून पाण्यात ॲल्युमिनियम सल्फेट टाकावे. या द्रावणात ३ तास फुले ठेवावीत व पॅकिंग हॉलचे तापमान १० सें च्या आसपास ठेवावे. नंतर प्रतवारी करावी व प्रतवारी नंतर फुले पुन्हा याच द्रावणात किंवा क्लोरीनच्या पाण्यात ठेवावीत. बादलीत ७-१० सेमी. पर्यंत द्रावण असावे. या द्रावणात फुले पॅकिंग करेपर्यंत ठेवावीत. जर वरील प्रीझरवेटीव्ह उपलब्ध नसतील तर २०० लिटर पाण्यात ३ किलो साखर व ६ ग्रॅम सायट्रिक अँसिड मिसळून द्रावण तयार करावे व त्यामध्ये फुले ठेवावीत.

**प्रतवारी** – गुलाबाच्या फुलांची प्रतवारी फुलदांड्याच्या लांबीवरून फुलाची लांबी वगळून केली जाते. प्रत्येक ग्रेडमध्ये १० से.मी. अंतर ठेवावे फुलांची ग्रेड ३० ते ९० सें. मी. ग्रेडमध्ये केली जाते. फुलदांड्याच्या लाम्बिबरोबरच दांड्याची जाडी, फुलाचा आकार, पाने व रोग व किटकनाशकांच्या रेसेडयुचाही विचार प्रतवारी करतांना केला जातो. प्रतवारी केलेल्या एका ग्रेडधील सर्व फुले त्याच प्रतीची असावीत. अन्यथा एखादे खराब फुल सारीच प्रतवारी बिघडवून टाकते. ग्रेडिंग केल्यावर पुन्हा फुले प्रीझरवेटीव्ह द्रावणात ठेवावीत.

**पॅकिंग** – २० ते २५ फुलाची एक जुडी याप्रमाणे जुड्या बांध्याव्यात. त्यानंतर प्रत्येक जुडी पेपरमध्ये गुंडाळावी असे पेपरमध्ये गुंडाळलेले बंच कोरुगेटेड बॉक्समध्ये भरावेत. बॉक्सला आतून पॉलिथिनचे लायनिंग असावे. जेणेकरून बॉक्स्मधील गरम हवा लगेचच बाहेर काढता येईल. शीतगृहातील तापमान २ से. ग्रे. पर्यंत असावे. बॉक्सचे तापमान शीतगृहाच्या तापमान इतके होण्यास १०-१२ तास लागतात. शीतगृहात ९० टक्क्यांच्या आसपास आर्द्रता ठेवावी म्हणजे डी-हायड्रेशन होणार नाही.

**शीतसाखळी** – फुले पॅक केल्यापासून ते ग्राहकाला मिळेपर्यंत शीत गृहाइतकेच राहण्याकरिता खालीलप्रमाणे शीतसाखळी असावी.

१. शेतावर शीतगृह असावे.

२. वाहतुकीसाठी रेफर व्हॅन असावी.

३. विमानतळावर शीतगृह असावे.

४. विमानात लगोलग माल भरणे.

५. विमानात शीतगृह सुविधा असावी.

६. माल उतरल्यावर तो शीतगृहात ठेवावा.

७. रेफर व्हॅनमधून ग्राहकाकडे पोहोचवावा.

**उत्पादनाचे नियोजन** – बरयाचदा बाजारात एकाच वेळेस माल आल्यामुळे फुलांच्या किमती उतरतात व उत्पादकाचे मोठया प्रमाणात नुकसान होते. ते टाळण्यासाठी जर फुले काढणी पुढे ढकलता आली तर उत्पादकांचा फायदा होतो. त्यासाठी फांदीवरील शेंड्याकडील भाग खुडून टाकावा म्हणजे फुलांची काढणी उशिरा सुरु होते.

**झाडांना विश्रांती देणे** – युरोपला आपल्या देशात निर्यात मुख्यतः ऑक्टोबर ते एप्रिल या काळात होते. कारण या काळात थंडीमुळे तेथे फुलांचे उत्पादन होत नाही व नियंत्रित तापमानाला फुले वाढविणे फार खर्चिक होते. इतर वेळी फुलांची निर्यात करणे आपणास फायदेशीर ठरत नाही. कारण आपली फुले त्यांच्या मालाशी स्पर्धा करू शकत नाहीत. म्हणूनच एक तर आपणास दुसरी बाजारपेठ शोधावी लागते किंवा मग अंतर्गत बाजारपेठेत कमी किमतीत विकावी लागतात. व ते परवडणारे नसते. त्यामुळे या ऑफ सिझनच्या काळात झाडांना विश्रांती दिल्यास पुढील काळात चांगली फुले मिळू शकतात. झाडांना विश्रांती देण्यासाठी शेवटचे फुल काढल्यानंतर ४-८ आठवडे पाणी देऊ नये. त्या काळात बरीचशी पाने पिवळी पडून झडून जातात. त्यानंतर मग ३०-६० से. मी. वर झाडांची छाटणी करावी. छाटणीनंतर खते व पाणी द्यावे. त्यानंतर येणाऱ्या फुटीचे कडक उन्हापासून शेडनेट वापरून संरक्षण करावे.

**जुन्या झाडांचे नुतनीकरण**– सर्व साधारणपणे जुनी झाडे काढून नवीन लावली जातात. पण बरयाचदा काही कारणास्तव असे करता येत नाही. त्यासाठी मग जुन्या झाडांचे नुतनीकरण खालीलप्रमाणे करावे.

झाडांना विश्रांती देण्यासाठी ३-५ आठवडे पाणी देणे थांबवावे.

झाडांच्या सभोवती जमिनीवर आच्छादन करावे आणि गाडी वाफ्याची उंची वाढवावी.

नवीन फुट काढून टाकावी व अस्तित्वात असलेली जुनी फुटही काढून टाकावी.

पाणी देणे थांबविल्यावर ३-५ आठवड्यांनी ३०-६० से.मी. उंचीवर झाडांची छाटणी करावी.

त्यानंतर नियमित पाणी व खते दयावीत.

नवीन फुटीचे शेंडे खुडावेत अथवा वाकवावेत. नंतर येणाऱ्या नवीन फुटीवर फुले घ्यावीत. ***

वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

# ग्लोबल भारत

संपादक - शरद खेमचंद अडागळे

## आपला जिल्हा, शहर, तालुक्यासह भागातील बातम्या नियमित वाचा 'ग्लोबल भारत'






मनोरंजन, कृषी, आरोग्य, करिअर यासह विविध विषयावर आठवड्यातून एक दिवस परिपूर्ण माहिती....

* अधिक माहितीसाठी संपर्क *

dailyglobalbharat@gmail.com
www.globalbharatlive.com